बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०४ | बुधवार, दि.३ जानेवारी २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# सनफ्लॅग कंपनीत स्फोट, ३ कामगार जखमी




**भंडारा:-** सनफ्लॅग आयर्न अँड स्टील कंपनीत आज पहाटे ३.१५ वाजता स्फोट झाला. यात ३ कामगार जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी नागपूर येथील खासगी रुग्णालयात तात्काळ हलवण्यात आले. या दुर्घटनेत ७ – ८ कामगार किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

सदर घटना कंपनीतील एसएमएस या विभागातील एल एच एफ युनिट मध्ये झाली. घटनेचे मूळ कारण अजून गुलदस्त्यात असून हिटिंग फरनेस मध्ये अचानक मोठा स्फोट झाल्याने तारांबळ उडाली. या भागात कार्यरत ३ कामगार काही प्रमाणात भाजल्या गेले व काही कामगारांना किरकोळ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

यात टेक्निसीयन नामदेव झंझाड, अभियंता सागर गभने व कंत्राटी कामगार हटवार हे जखमी झाले. त्यांना नागपूर येथे हलवण्यात आले. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती व्यवस्थापनाने दिली.

स्फोट एवढा भयानक होता की कंपनीतील जवळपास असलेले परिसर हादरले होते. या दुर्घटनेत कंपनीतील सामानाचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने प्राणहानी झाली नाही.

## स्व.मनोहरभाई पटेल जयंती कार्यक्रमाला उपराष्ट्रपतीसह गृहमंत्री येणार!




**गोंदिया :-** गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील स्वनामधन्य नेता व शिक्षण महर्षी स्वर्गीय मनोहरभाई पटेल यांच्या ११८ व्या जयंतीनिमित्त ९ फेब्रुवारी २०२४ रोज शुक्रवारला सुवर्णपदक वितरण समारंभाचा कार्यक्रम डी.बी.सायंस कॉलेज परिसराच्या प्रांगणात सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आला असून या सुवर्णपदक वितरण समारंभाला यावर्षी देशाचे उपराष्ट्रपती जगदिप धनखड हे प्रमुख अतिथी राहणार असून सोबतच केंद्रीय गृहमंत्री अमीत शाह हे सुद्धा येणार असल्याचे वृत्त आहे. स्व.मनोहरभाई पटेल जयंती उत्सव कार्यक्रमाचे औचित्य साधून गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे भूमिपूजन सुद्धा होणार असल्याचे वृत्त आहे.

सुवर्णपदक वितरण कार्यक्रमाचे आयोजन गोंदिया शिक्षण संस्था, मनोहरभाई पटेल स्मृती समिती व गुजराती राष्ट्रीय केळवणी मंडळ द्वारा करण्यात येते. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम, उपमुख्यमंत्री अजीत पवार हे सुद्धा उपस्थित राहणार आहेत.

# निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन नव्या वर्षांत प्रत्येक जिल्ह्यात सांस्कृतिक, युवा महोत्सव

**गोंदिया:-** सोमवारपासून सुरु झालेले २०२४ हे नवे वर्ष निवडणुकीचे असल्याने राज्य शासनाने पहिल्या सहा महिन्यांतच विविध विभागांच्या माध्यमांतून अनेक महोत्सवांचे आयोजन केले असून त्यासाठी घसघशीत आर्थिक तरतूदही केली आहे. २३ पासूनच अनेक सरकारी कार्यक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या कामाची प्रसिद्धी व प्रचार सुरू असून त्यावर कोट्यावधीचा निधी आजपर्यंत उधळला गेला आहे. कधी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने विविध गावांमधील माती गोळा करणे असो किंवा विकास यात्रेच्या माध्यमातून केंद्राच्या योजनांची माहिती देणे असो. महाराष्ट्र सरकारही यात मागे नाही, “सरकार आपल्या दारी’च्या माध्यमातून राज्यभर अनेक कार्यक्रम राज्याच्या विविध भागात झाले आहे.

आत्ता सोमवारपासून सुरु झालेल्या २०२४ ची सुरुवातही विविध महोत्सवांच्या माध्यमातून होत आहे. सांस्कृतिक विभागाच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त १५ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात सलग पाच दिवस महासंस्कृती



महोत्सव आयोजित करण्यात आले आहे. विविध राज्यातील संस्कृतीचे आदान प्रदान, लुप्त होत चाललेल्या संस्कृतीचे जतन व संवर्धन आणि स्वातंत्र्यलढयाची माहिती लोकांपर्यंत पोहचवणे यासाठी हा कार्यक्रम असल्याचे या खात्याच्या २२ डिसेंबरला काढलेल्या शासन निर्णयात नमूद आहे. याकरीता प्रत्येक जिल्ह्याला २ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

### कार्यक्रम काय?

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा खात्यातर्फे १५ जानेवारीपासून प्रत्येक जिल्ह्यात युवा महोत्सव होणार आहे. युवकांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून हा उपक्रम असल्याचा दावा शिक्षण विभागाने २२ डिसेंबरला काढलेल्या शासन निर्णयात केला आहे.

पर्यटन व सांस्कृतिक खात्यार्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षांनिमित्त जून २०२३ पासून विविध कार्यक्रम राज्यभर घेतले जात आहेत. याच उपक्रमाचा पुढचा भाग म्हणून आता जानेवारी ते जून २०२४ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात तीन दिवस छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित महानाटय महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. त्यासाठी ३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातून महानाटयाची प्रसिद्धी आणि आयोजनाच्या खर्चासाठी प्रत्येक जिल्ह्यांना निधी देण्यात आला आहे.

# वर्षाच्या सुरवातीलाही इंडिगो विमानाचे बिरसी विमानतळावर “नो लॅंडींग”

### हैद्राबाद-गोंदिया-तिरुपती विमानसेवा दहा दिवसांपासून ठप्पच

**गोंदिया :** येथील बिरसी विमानतळावरुन सुरु झालेली हैद्राबाद गोंदिया विमानसेवा खराब वातावरण आणि कमी दृश्यतेअभावी २०२३ च्या डिसेंबरमध्ये बंद पडली ती नववर्षाच्या २०२४च्या सुरवातीलाही ती सुरु न झाल्याने गोंदिया- हैद्राबाद विमाानसेवेला फटका बसला असून प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.


इंडिगो विमान कंपनीने गोंदियाच्या बिरसी विमानतळावरुन गोंदिया-हैद्राबाद-तिरुपती या प्रवासी विमान वाहतूक सेवेला १ डिसेंबरपासून सुरुवात केली. जवळपास २१ दिवस ही सेवा सुरळीतपणे सुरु होती. २२ व्या दिवसांपासून खराब वातावरण व कमी दृश्यतेअभावी ही विमानसेवा ठप्प पडली आहे. डीजीसीएने ५ हजार मीटर दृश्यतेशिवाय टेकऑप आणि लॅंडिंग करण्यास मनाई केली आहे. तर सध्या तीन ते साडेतीन हजार मीटर दृश्यता असल्याने विमानतळावर विमान उतरविण्याची परवानगी दिली जात नाही. त्यामुळे तिरुपतीहून गोंदियाला येणारे येथे उतरु शकले नाही आणि गोंदियाहून हैद्राबाद जाणाऱ्या विमानाचे उड्डाण सुध्दा झाले नाही.

रविवारला सुध्दा हीच समस्या कायम होती. त्यामुळे गोंदियासह लगतच्या मध्यप्रदेश आणि छत्तीसगडच्या प्रवाशांना या सेवेचा लाभ घेता आला नाही. तर अनेक प्रवाशांना आधी बुक केलेले तिकिट रद्द करावे लागले. त्यामुळे त्यांना त्यांचा नियोजित कार्यक्रम सुध्दा रद्द करावा लागला. तर इंडिगोच्यावतीनेही प्रवाशाना पाहिजे तसे सहकार्य केले जात नसल्याचे काही प्रवाशांचे म्हणने आहे. जेव्हापर्यंत दृश्यतेची अडचण दूर होणार नाही तेव्हापर्यंत ही सेवा पुर्ववत होण्याची शक्यता कमी असल्याचे विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.




### आयएलएस लागल्यानंतर दूर होईल अडचण

कमी दृश्यता असताना देखील विमानतळावरुन टेकऑफ आणि लॅंडिंग करण्यासाठी इन्स्ट्रूमेंट लॅंडिंग सिस्टम (आयएलएस) ही यंत्रणा मदतपुर्ण ठरते. बिरसी विमानतळ प्राधिकरणाने ही यंत्रणा रशिया येथून मागविली असून ती दोन महिन्यापासून येथे पडून आहे. पण यंत्रणा अद्यापही कार्यान्वित केली नाही. बिरसी विमानतळाच्या परिसरातून गेलेला परसवाडा-कामठा हा मार्ग बंद केल्यानंतरच ही यंत्रणा लावण्याचे काम सुरु केले जाणार असल्याचे बिरसी विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. जर आयएलएस ही यंत्रणा लवकर कार्यान्वित झाली तर ही अडचण कायमची दूर होवू शकते.



## नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव प्रकल्पामध्ये ५ ते ७ जानेवारी दरम्यान दुसरे पक्षी सर्व्हेक्षण

**गोंदिया :** नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रामध्ये विविध अधिवासामध्ये राहणाऱ्या विविध पक्ष्यांच्या प्रजातींचे अन्वेषण व दस्तऐवजीकरण तसेच पक्षी विविधतेचा सर्व समावेशक अभ्यास करण्याकरीता दिनांक ५, ६ व ७ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये दुसरे पक्षी सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

सदर पक्षी सर्व्हेक्षणात सहभागी होवू इच्छिणाऱ्या पक्षीप्रेमींचे दिनांक ६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.३० पासून ते १६ डिसेंबर २०२३ रोजी रात्री १० वाजतापर्यंत फक्त ५० जागेकरीता अर्ज स्विकारण्यात येतील व प्रति व्यक्ती १६०० रुपये याप्रमाणे फी आकारण्यात येईल. यासाठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने https://forms.gle/b2ciEMmivjtDfnPo8 या लिंकवर रजिष्ट्रेशन करता येईल. त्यासाठी ठ्व कोडवर आवेदन करण्याबाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे. तरी नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव प्रकल्पाचे दुसरे पक्षी सर्व्हेक्षण-२०२४ कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व इच्छुक पक्षीप्रेमींनी याबाबत नोंद घ्यावी, असे नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपसंचालक पवन जेफ यांनी कळविले आहे.

# धान खरेदी करणाऱ्या संस्थांना मिळालेले आश्वासन अंधारात

**सडक अर्जुनी:-** विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यामध्ये हमी भाव अंतर्गत शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र सन २०००-२००१ पासून सुरु आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला शासनाने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे योग्य भाव मिळावा असा भारत सरकार व राज्य सरकारचा मुळ हेतु आहे.राज्य शासनाचे राज्यात दोन मुख्य अभिकर्ते महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन मुंबई व आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांचेवर उत्पादित धानाची खरेदी करण्याची जबाबदारी सोपविली आहे.



खरीप हंगाम २०२३-२४ सुरू होण्या अगोदर महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांनी खरेदी करणाऱ्या संस्थांनी ५० लक्ष चा बोझा ऐवजी एक कोटीचा मालमत्तेवर बोझा चढवण्याचा व अमानत रक्कम १० लक्ष ऐवजी अमानत रक्कम २० लक्ष घेण्यात यावी. तसेच खरेदी मालावर घट ही एक टक्का ऐवजी अर्धा टक्का व कमीशन प्रती क्विंटल रु.२०.४०पैसे या प्रकारचा निर्णय मार्केटिंग फेडरेशन मार्फत धान खरेदी करणाऱ्या सहकारी संस्थांना आक्टोंबर महिन्यात कळविण्यात आले.

या निर्णयाचे विरोधात उपअभिकर्ते सहकारी संस्थांनी खरेदी सुरू न करण्याचा निर्णय पाचही जिल्ह्यातील संस्थांनी घेतला होता. व त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आले होते. या समस्याचे निराकरण करण्यासाठी पाचही जिल्ह्याचे आमदार, खासदार यांनी राज्याचे अन्न नागरी पुरवठा वग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांचे लक्ष वेधण्यात आले. याबाबत सह्यांद्री अतिथी गृहात १ नोव्हेंबर २०२३ ला सभेचे आयोजन करण्यात आले.मंत्री छगन भुजबळ यांचे अध्यक्षतेत पार पडली. सभेत भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री विजयकुमार गावित, गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम, खासदार प्रफुल पटेल, खासदार सुनिल मेंढे, आमदार नाना पटोले, विजय वड्डेटीवार, विनोद अग्रवाल, देवराम होळी, मनोहर चंद्रीकापूरे, आशिष जैसवाल, कृष्णा खोपडे, विजय राहांगडाले, राजु कारेमोरे, माजी मंत्री परिणय फुके, माजी खासदार शिशुपाल पटले, माजी आमदाय भैरसींग नागपूरे तसेच गोंदिया व भंडाराचे जिल्हाधिकारी, मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी महामंडळाचे अधिकारी तसेच संस्था प्रतिनिधी उपस्थित होते.

सभेत मालमत्तेवर बोझा व अमानत रक्कम ही हंगाम २०२२-२३ प्रमाणेच ठेवण्यात यावी.असा निर्णय देण्यात आला. घट एक टक्के देण्याचे, कमीशन अगोदर प्रमाणे रु.३१.२५ प्रति क्विंटल व हमालीप्रती क्विंटल रु.१५ प्रमाणे तसेच खरेदी मालाची उचल दोन महिन्यात करण्यात येईल याबाबतचे आश्वासन लोकप्रतिनिधी व उपस्थित संस्था प्रतिनिधींना देण्यात आले. जवळपास दोन महिन्याचा कालावधी झाला असतांनी घट, कमीशन व हमाली बाबत अन्न, नागरी व पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालय कडून शासन निर्णय ची मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी महामंडळ तसेच धान खरेदी संस्था आतुरतेने वाट बघत आहेत.

### अवाढव्य कर आकारणीच्या विरोधात आज जन आक्रोश मोर्चा

**अर्जुनी मोर. :-** अर्जुनी मोर नगरपंचायत चे मुख्याधिकारी यांच्या विरोधात मालमत्ता व इतर कर विरोधात आज दि.३ जानेवारी २०२४ ला जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण अर्जुनी मोर. बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात येईल असा इशारा व्यापारी संघटन व नगरवासी नागरिक कृती समिती अर्जुनी मोर. यांच्या वतीने देण्यात आलेला आहे. अर्जुनी मोरगावला ग्रामपंचायत होती. पण शासनाच्या आदेशाने या गावाला नगरपंचायतीचा दर्जा देऊन नगरपंचायत झाली. पण नगरपंचायतने विशेष कोणत्या सुविधा न देता बेसुमार नवीन कर वसुलीचे नोटीस सहरवासीयांना दिले आहेत. तसेच करा संबंधी सुनावणी करून प्रकिया पूर्ण करून पेपरला जाहीर सुद्धा केले आहे. एवढी अवाढव्य वाढ कोणीही नागरिक व व्यापारी सहन करू शकत नाही .आणि नगरपंचायत सक्तीची वसुली करण्याची कारवाई करण्याच्या तयारी करत आहे. शासनाचे अधिकारी मुख्याधिकारी नगरवासीयांचा विचार न करता मोठमोठ्या महानगराचे टॅक्स मालमत्ता कर चे दर या नगरपंचायतीला लावून पैसा शासन दरबारी नेण्यासाठी आमच्या अर्जुनी ग्रामवासियांवर अन्याय करून लूट करण्याचा माणस दिसत आहे. तरी या मालमत्ता कर वाढीला विरोध करण्यासाठी सर्व नगरवासी महिला पुरुष तसेच व्यापारांनी जास्तीत जास्त संख्येने मोर्चात सहभागी व्हावे,असे आवाहन केले आहे.

# घरफोडी-लुटमारीच्या गुन्ह्यात सर्वाधिक बालगुन्हेगार महाराष्ट्रात

**गोंदिया :** चोरी, घरफोडी, लुटमार आणि दरोड्यासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक बालगुन्हेगार महाराष्ट्रात असून दुसऱ्या स्थानावर तमिळनाडू आहे, अशी माहिती राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या अहवालातून समोर आली आहे.देशात १० हजार १० गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन गुन्हेगारांचा समावेश असून त्यांनी चोरी, घरफोडी, दरोडा, लुटमार आणि खंडणीसारखे गंभीर गुन्हे घडवून आणले. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक १४२६ अल्पवयीन गुन्हेगार आहेत. दुसऱ्या क्रमांकावर तमिळनाडू असून ९५२ गुन्हेगारांचा समावेश आहे. तिसऱ्या क्रमांकावर ओडिशा (८८४), राजस्थान (८५७) आणि मध्यप्रदेश (७७७) आहे. अल्पवयीन गुन्हेगारांमध्ये बिहार-उत्तरप्रदेशसारख्या राज्याला महाराष्ट्राने मागे टाकले आहे. देशात ६ हजार ४९५ अल्पवयीन गुन्हेगारांचा समावेश चोरीच्या गुन्ह्यात तर घरफोडीच्या गुन्ह्यात २ हजार ३० बालगुन्हेगारांचा समावेश आहे. अनेक मोठ्या गुन्हेगारांच्या टोळीत अल्पवयीन मुलांचा वापर करण्यात येतो. अशा गुन्हेगारीतून अल्पवयीन गुन्हेगार बाहेर पडणे कठीण असते.



सर्वाधिक विधिसंघर्षग्रस्त बालक मुंबई आणि पुण्यात आहेत. बाल गुन्हेगारांमध्ये नागपूर तिसऱ्या स्थानावर आहे. मुंबईत सर्वाधिक ३६३ बालगुन्हेगारांची नोंद करण्यात आली तर पुण्यात २७८ आणि नागपुरात २१० बालगुन्हेगारांची नोंद करण्यात आली. छत्रपती संभाजी नगर, नाशिक जिल्ह्यात बालगुन्हेगारी कमी असल्याचे आढळून आले.

एखाद्या गुन्ह्यात १४ ते १७ वयोगटातील मुलांचा समावेश असल्यास पोलीस त्यांची बालगुन्हेगार म्हणून नोंद करतात. मात्र, त्यांना बालगुन्हेगारीतून बाहेर काढण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करीत नाहीत. चोरी-घरफोडीसारख्या गुन्ह्यात अल्पवयीन आरोपींबाबत पोलिसांची कायमच नकारात्मक भूमिका असते. त्यामुळे महाराष्ट्रात बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात.

# पांगोली नदीचे पुनरुज्जीवन रेंगाळलेलेच

**गोंदिया :** जिल्ह्याची जीवनदायिनी आणि चारही विधानसभा क्षेत्रातून वाहणाऱ्या पांगोली नदीच्या खोलीकरण आणि रुंदीकरणासाठी मृदा व जलसंधारण विभागाने तयार केलेला ४४ कोटींचा प्रस्ताव नागपूरच्या अधीक्षक अभियंता (सर्कल) कार्यालयात धूळखात पडून आहे. त्यामुळे आजही ही नदी आपल्या अस्तित्वावर अश्रू ढाळत आहे.

गोरेगाव तालुक्याच्या तेढा गावातील सरोवरातून पांगोली नदीचा उगम झाला. गोंदिया तालुक्यातील खातिया गावाजवळ छिपिया येथे मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट सिमारेषेवरील वाघ नदीत तीचे संगम होते. गोंदिया व गोरेगाव तालुक्यातील ६० किमी क्षेत्र, आमगाव तालुक्यातील १५ किमीचे क्षेत्र या नदीने व्यापले आहे. गोंदिया, गोरेगाव तालुक्यातील शेकडो शेतकरी पांगोलीच्या पाण्यावर शेती पिकवितात. आमगाव तालुक्यातील काही गावांनाही या पाण्याचा लाभ होतो. मात्र, आजघडीला या नदीची अवस्था अतिशय बिकट आहे. विषारी रसायने मिसळली जात असल्याने ही नदी प्रदूषित झाली आहे.

शेती व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गतवर्षी ऑक्टोबरमध्ये तत्कालीन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पांगोलीच्या पुनरुज्जीवनासाठी १० लाख रुपये मंजूर केले. डीपीआरसाठी मृदा व जलसंधारण विभागाने टेंडर काढला. नागपूरच्या कंपनीला टेंडर मिळाला. त्यानुसार, कंपनीने नदीचा सर्वे केला. मार्च २०२३ मध्ये ४४ कोटी रुपयांचा डीपीआर खोलीकरण आणि रुंदीकरणासाठी तयार केला. डीपीआर नागपूरच्या मृदा व जलसंधारण विभागाच्या सर्कल कार्यालयाला गेला. परंतु, यात त्रुट्या निदर्शनात आल्या. त्रुट्यांची पूर्तताही झाली. मात्र, अजूनही



फाइल सरकारदरबारी पोहोचली नाही. फाइल नागपूरच्या अधीक्षक अभियंता (सर्कल) कार्यालयात धूळखात आहे. परिणामी, नदीच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न रेंगाळलेलाच आहे. नदीचे तत्काळ पुनरुज्जीवन व्हावे, अशी मागणी परिसरातील नागरिक करू लागले आहेत.

राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाच्या जुलैच्या शासननिर्णयानुसार शहरी क्षेत्रातून वाहणाऱ्या अधिसूचित नद्यांची वहनक्षमता पुन: स्थापित, पुनजीवित करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याचे जे धोरण ठरविण्यात आले आहे, त्या अधिसूचित नद्यांच्या यादीत पांगोली नदीचादेखील समावेश करण्यात यावा, पांगोली नदीवर मृदा व जलसंधारण विभागाकडून तसेच जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे विभागाकडून बांधण्यात आलेल्या व आता जीर्ण झालेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याची व अन्य स्वरुपाच्या बंधाऱ्यांची दुरूस्ती करण्यात यावी, नदी प्रवाह क्षेत्रात आवश्यक ठिकाणी नवीन बंधारे बांधण्यात यावीत, नदीच्या दोन्ही काठांवर देशी प्रजातीची झाडे लागवड करावीत, पांगोली नदीच्या पात्रात प्रदूषित सांडपाणी सोडणारे, नदी काठाशेजारी असणारे राईस मिल, लाख कारखाने व इतर कारखान्यांवर प्रशासनाने कारवाई करावी, छोटा गोंदियातील नदी पात्राशेजारील परिसरात सांडपाणी जल पुनर्वापर व व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात यावा, पांगोली व वाघ नदीचे संगमस्थळ छिपिया येथे जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात यावे, नदीकाठालगत असणाऱ्या स्मशानभूमी व धार्मिक स्थळांचा विकास करण्यात यावा, छोटा गोंदिया-चुलोद मार्गावरील पांगोली नदीवर असणाऱ्या जुन्या अरुंद पुलाऐवजी रुंद व दोन्ही बाजूंकडून वाहने ये-जा करू शकतील या स्वरुपाचा रहदारी पूल बांधावा, अशा मागण्या पांगोली नदी वाचवा अभियान कृती समितीचे संयोजक तिर्थराज उके यांनी केल्या आहेत.

# १३३ मत्स्यपालन सहकारी संस्था डबघाईस

**गोंदिया:** तलाव, वनसंपदा आदी जैवविविधतेने संपन्न म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यात पारंपारिक व्यवसाय मोडकळीस येऊ लागले आहे. यासाठी शासन, प्रशसनाचा उदासिन कारभार जबाबदार असल्याचे दिसून येत आहे .जिल्ह्यात दुध, पशुपालन व्यवसायानंतर मत्स्य व्यवसायही आता संकटात सापडला आहे. शासकीय अनास्थेमुळे मत्स्य व्यवसायासाठी जिल्ह्यात ६७७८ अनूकूल स्त्रोत असून १३३ मत्स्यपालन संस्था डबघाईस आल्या आहेत.



गोंदिया जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या जिल्ह्यात एकेकाळी मत्स्य व्यवसायाला अच्छे दिन होते. विशेषतः जिल्ह्यातील ढिवर, कहार व इतर जातीचे ९० टक्के कुटूंब या व्यवसायावर अवलंबून होते. मात्र दिवसेंदिवस शासन व प्रशासनाच्या उदासिन कारभारामुळे मत्स्य व्यवसाय जिल्ह्यात संकटात येऊ लागला आहे. जिल्ह्यात पर्याप्त भूजल मत्स्य व्यवसायासाठी स्त्रोत आहे. मात्र या व्यवसायाच्या वाढीसाठी शासन व प्रशासनाकडून राबविण्यात येणारे उपक्रम फक्त नावापुरतेच ठरत आहे. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेले लाखो कुटूंब पारपारिक व्यवसायाला दुरावून कामाच्या शोधात भटकंती करीत आहे.

जिल्ह्यात मत्स्य व्यवसायासाठी ६ हजार ७७८ तलाव, सरोवर, जलाशय आहेत. यामध्ये तिरोडा तालुक्यातील ९५१ क्षेत्र, गोरेगाव ९३६, गोंदिया १२९३, आमगाव ६०४, सालेकसा १२५०, सडक अर्जुनी ४२०, अर्जुनी मोरगाव ५६३, देवरी ७६१ क्षेत्र मत्स्य व्यवसायासाठी अनुकूल आहे. तसेच मत्स्य व्यवसाय करण्यासाठी जिल्ह्यात मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात मत्स्य व्यवसाय केला जातो. मात्र मत्स्य व्यवसाय संकटात येऊ लागल्याने संस्थाही डबघाईस येऊ लागल्या आहेत. जिल्ह्यात १३३ संस्था असून सभासद संख्या १०४४१ आहे. मात्र काही संस्था कंत्राटदारांच्या ताब्यात असल्यामुळे त्या संस्था फक्त कंत्राटदारापुरतेच कागदावर सुरु आहेत.

जिल्ह्यात ढिवर समाज मोठ्या संख्येने आहे. या समाजाचा मुख्य व्यवसाय मासेमारी आहे. शासनाने मासेमारीचा अधिकार दिला. मात्र काही बड्या व्यक्तीनींच या अधिकारावर कब्जा केला असून त्यांच्याकडे समाज बांधवांना मजुरीने मासेमारी करावी लागत आहे. समाजाच्या मागण्या अनेकदा शासनाकडे मांडून देखील त्याची दखल घेत नसल्याने समाजाचा रोजगार हिरावला जात आहे, अशी प्रतिक्रिया जिल्हा ढिवार समाज संघटनेचे शामू मेश्राम यांनी सांगितले.

## संपादकीय

### स्वतःच्या चुका लपवण्यासाठी इतरांना बदनाम करणे!

चुका होतात, प्रत्येक व्यक्तीकडून कळत-नकळत, अनावधानाने चुका या होतच असतात. कोणतीही चूक मग ती अगदी मोठी असली तरी एकदा झाली, दोनदा झाली तर ती सगळेच माफ करतात, विसरून जातात. वेळप्रसंगी अशा व्यक्तीला सगळे खंबीरपणे सोबत करतात, आधार देतात, त्याला पाठबळ देतात आणि त्याच्या चुकांचे परिणाम भोगून सुद्धा त्याच्यासोबत राहतात. चुकलेली व्यक्तीसुद्धा सगळ्यांची जाणीव ठेवून, सगळ्यांचे आभार मानून स्वतःला सावरते, पुन्हा नव्याने उभी राहते. भविष्यात परत आपल्याकडून असं घडणार नाही याची काळजी घेते.

अनेकदा आपण बघतो की, काहीजण सातत्याने ठरवून चुकीचं वागतात, चुका करताना दिसतात. इतरांना गृहीत धरुन, वेठीला धरुन परत परत ठरवून जर कोणी असं वागत असेल तर त्याला अचानक घडलेली चूक आहे किंवा घाईत, रागात, भावनेच्या भरात, गडबडीत घडलेली घटना आहे, असं म्हणता येत नाही किंवा त्याकडे इतरांनी दुर्लक्ष करणं पण योग्य नाही. आपल्या आजूबाजूला, कुटुंबात, समाजात अशी अनेक माणसं असतात जे ठरवून जाणूनबुजून अशा गोष्टी करत असतात. ज्या इतरांसाठी त्रासदायक आहेत, नुकसानकारक आहेत. अशा लोकांना स्वतःला पण त्याचा अनेकदा त्रास होतो, झालेला असतो. पण त्यांच्यात सुधारणा काही होत नसते, त्यांचा स्वभाव बदलत नसतो, सवयी बदलत नसतात. चुकीचं वागणं, खोटं बोलणं, सावरासावर करणं, आपल्या चुकांना इतरांना कारणीभूत धरणं हा अशा लोकांचा जणू गुणधर्मच असतो.

अशा प्रकारचे लोक किंवा अशी मनोवृत्ती असलेले लोक स्वतःच्या चुका तर कधीच मोठ्या मनाने किंवा हिमतीने कबूल करत नाहीत, कधी कोणाची माफी मागत नाहीत किंवा कधी कमीपणा अथवा माघार घेत नाहीत. आपलंच खरं करण्याची वृत्ती, इतरांना वेठीला धरण्याची मानसिकता, हट्टी आणि हेकेखोर पणामुळे अशी लोकं स्वतः चं नुकसान तर करुन घेतातच पण त्यांच्या जवळचे, घरातले, सहवासातले लोकपण त्यात विनाकारण भरडले जातात, हे दयनीय आहे. सातत्याने जाणूनबुजून चुकीच्या गोष्टी करत राहणारे, चुकीच्या मार्गावर चालणारे, सर्व तत्त्व आणि नीतीमूल्यांना फाट्यावर मारणे, नीतिमत्ता सोडून वागणारे आणि इतरांना, इतरांच्या सल्ले, सूचना, मार्गदर्शन याला कवडीचीही किंमत न देणारे असे लोक फक्त चुका करुन, चुकीचे निर्णय घेऊन, त्याचे परिणाम भोगून शांत बसत नाहीत, तर उलट त्यांच्याशी संबंधित लोकांना बदनाम करुन सोडतात. स्वतःच्या व्यक्तिगत, वैयक्तिक आयुष्यात तर ते वाटेल तसे भरकटतात. पण इतरांनाही मनस्ताप देतात. इतरांनापण चुकीच्या गोष्टी स्वीकारायला भाग पाडतात.

मी कसा बरोबर होतो किंवा आहे आणि इतरांमुळे म्हणजेच कुटुंबातील लोक, नातेवाईक, समाज, हाताखालील अथवा सहकर्मचारी, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांच्यामुळे मला कसा त्रास झाला, त्यांच्यामुळे मी कसा चांगला असून पण बरबाद झालो, लोकांनी कसा माझा गैरफायदा घेतला, ते कसे वाईट होते, त्यांनी कसं मला सांभाळून, समजावून घेतलं नाही, इतरांनी कशी मला साथ सोबत दिली नाही, इतरांनी कसा सतत माझ्यावर अन्याय-अत्याचार केला हे सांगून, इतरांची बदनामी करुन, दुसऱ्यांना कायम वाईट खलनायक ठरवून स्वतःच्या चुका झाकण्याचा सतत प्रयत्न करत असतात.

आपल्या चुकीवर पांघरुन घालण्यासाठी घरातील, नात्यातील, संबंधित, संपर्कातील लोकांची निंदा करणे, त्यांच्याबद्दल वेगवेगळ्या खोट्या अफवा पसरवणे, त्यांच्या चारित्र्यावर ताशेरे ओढणे, चारचौघांत सतत इतरांबद्दल खोटी माहिती पसरवणे अशा लोकांना अंगवळणी पडलेले असते. मी वैयक्तिक चुकलो हे स्वीकारणे, मान्य करणे, त्यावर सगळ्यांना विश्वासात घेणे, झालेल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करणे, त्यातून मार्ग काढणे, त्यासाठी दोन पावले मागे येणे, दुसऱ्याला मोठेपण देणे, त्यांच्या स्वभावात नसते. आपलं म्हणणं खरं करण्यासाठी, मनमानी करण्यासाठी सतत दुसऱ्यावर चिखलफेक करत राहणे, दुसऱ्याला नाव ठेवत राहणे, कुरघोड्या करत राहणे, सतत बदल्याची भावना मनात बाळगणे अशी विकृत मानसिकता या लोकांची असते. आपल्या आयुष्यात जे काही वाईट आहे, चुकीचं आहे, आपल्या मनाविरुद्ध अथवा इच्छेविरुद्ध घडलेलं आहे ते आपणच निर्माण केलेलं आहे, याची जबाबदारी घेऊन त्यात सकारात्मक बदल करण्याऐवजी माझ्या या अवस्थेला बाकीचे कसे जबाबदार आहेत, हे पटवून देण्यात अशा लोकांचा हातखंडा असतो.

आपलं जे चांगलं आहे, जे आपल्याला मिळालेलं आहे त्याचं श्रेय मात्र आपलं आहे, चांगलं जे घडलं ते आपलं कर्तृत्व आहे, पण जे काही वाईट घडलं आहे त्याला इतर लोक कसे जबाबदार आहेत हे पसरवण्यात असे लोक अग्रेसर असतात. आपल्या चुका, चुकीचं वागणं, चुकीचे निर्णय इतरांना लक्षात येऊ नयेत, आपल्याबद्दल सत्य कोणाला समजू नये, आपल्या चुकीच्या खोट्या गोष्टी कोणाच्या लक्षात येऊ नयेत, आपलं दूषित व्यक्तिमत्त्व कोणाला समजू नये म्हणून इतरांची दिशाभूल आणि बुद्धिभेद करण्यात अशी लोकं पारंगत असतात. आपण केलेल्या चुका किंवा आपल्यामुळे इतरांना झालेले नुकसान, त्रास, वेदना, यातना याबद्दल हे लोक कधीच बोलत नाहीत. पण कोणालाच आपली चुकीची बाजू समजू नये, आपल्यातील दोष, कमतरता, अपयश कोणाच्या लक्षात येऊ नये म्हणून बाकीच्यांना दोष देणे, इतरांवर खापर फोडणं, दुसऱ्याला कोसत राहणं, दुसऱ्याबद्दल अपप्रचार करणं यांसारख्या क्लृप्तया हे लोक लढवतात.

वारंवार त्याच चुका करुनसुद्धा दरवेळी कोणाच्या तरी डोक्यावर त्याचं खापर फोडून, नवीन काल्पनिक कथानक तयार करुन, आपल्याला कसं कोणी फसवलं, धोका दिला, गैरफायदा घेतला, आपण कसं मजबूर होतो, हतबल होतो याच्या काल्पनिक कहाण्या सांगून हे लोक वेळ मारुन नेण्यात पटाईत होत जातात. अशा लोकांच्या आजूबाजूला, घरात, जवळ असणारे सगळेच तितके चाणाक्ष किंवा हुशार नसतात की, त्यांना अशा वृत्तीचे लोक ओळखू येतील, त्यांचे हेतू लक्षात येतील किंवा ते स्वतःला अशा लोकांपासून सावध करू शकतील. खूप लोकांना आपल्या आजूबाजूला एक तरी अशी त्रासदायक व्यक्ती आहे, जिच्यामुळे आपणपण गोत्यात येऊ शकतो, फसू शकतो किंवा बदनाम होऊ शकतो याची कल्पना सुद्धा नसते. त्यामुळे आपल्याला भेटलेली, जवळची, आपल्याच घरातील, संपर्कातील माणसं जर असं सतत चुकीचं वागत असतील आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी कायम दुसऱ्याला वाईट ठरवत असतील, दुसऱ्यावर आरोप करत असतील, इतरांच्या नावाने खडे फोडत असतील तर प्रत्येकाने वेळीच सावध होणे अत्यंत आवश्यक आहे.

स्वतःच्या चुकीच्या कृत्यातून इतरांचं नुकसान करुन पण जर अशा लोकांना त्या कृत्याची कबुली देता येत नसेल, आपली चूक स्वीकारता येत नसेल, तर अशा व्यक्ती खूप घातक ठरू शकतात. स्वतःला वाचवण्यासाठी, स्वतःचे दोष झाकण्यासाठी हे कोणत्याही हद्दीला जावून कोणाचाही बळी देऊ शकतात, कोणत्याही थराला जाऊन कोणालाही बदनाम करू शकतात. समाजात, कुटुंबात वावरताना स्वतःला सतत जागृत ठेवणे, स्वतःची निरीक्षण शक्ती, आकलन शक्ती वाढवणे, प्रत्येकाच्या बोलण्यातले खरे अर्थ समजून घेणे, वागणे आणि बोलणे यातील फरक लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**मीनाक्षी जगदाळे**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# सावत्रीमाई फुले महिला शिक्षणाच्या उध्दारकर्त्या



सावित्रीमाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुलींचे शिक्षण आणि स्त्रियांचे कल्याण साधण्यात व्यथित केले. मुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी ज्योतिबा फुले यांच्या साह्याने पुणे शहरात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यानंतर त्यांनी समाजामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध देखील लढा दिला. त्यांनी केलेले कार्य संपूर्ण स्त्रियांसाठी खूपच मूल्यवान आहे.

आजच्या या पोस्टमध्ये सावित्रीमाई फुले यांच्या वर निबंध लिहून दिलेला आहे. या निबंधातून सावित्रीमाई फुले यांची संपूर्ण माहिती, शिक्षण, पुरस्कार, कार्य या बद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. हा निबंध सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त आहे.

सावित्रीमाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा येथे झाला. सावित्रीमाई फुले यांचे वयाच्या नऊव्यावर्षी जोतिबा फुले यांच्याशी लग्न झाले. महात्मा ज्योतिबा फुले हे एक महान विचारवंत समाजसुधारक, लेखक आणी क्रांतिकारक होते. सावित्रीमााई फुले यांना भारताची पहिली महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते.

त्यांना भारतीय स्त्रीविधाची जननी मानले जाते. त्यांचे पती जोतिबाराव फुले यांच्या प्रदेशात त्यांनी भारतातील महिला आधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीमाईनी आणि ज्योतिबारावांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा उघडली.

त्यांनी विधवा, केशवपन थांबवण्यासाठी नहाव्याचा संप केला. सवित्रीमाईच्या आईचे नाव लक्ष्मीबाई होते तर वडीलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते . सावित्रीमाईचे सासरे गोविंदराव फुले हे मूळचे फुरसुंगीचे गोरे परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस म्हणून दिली. त्यामुळे त्यानंतर त्यांचे गोरे हे आडनाव संपुष्टात येऊन तेथील लोक त्यांना फुले या नावाने ओळखू लागली.

सावित्रीमाई फुले यांचे टोपण नाव ज्ञानज्योती आणि ज्योती असे होते. सावित्रीमाई फुले या धर्माने हिंदू होत्या. त्यांचा जन्मदिवस हाा संपूर्ण भारत देशात बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. स्वतः सावित्रीमाई मुलींना शिकवण्यासाठी शाळेत जात असत. त्याकाळी मुलींना शिक्षण घेण्यास त्या काळातील लोकांची परवानगी नव्हती. त्यामुळे सावित्रीमाई देखील सुरुवातीला अशिक्षित होत्या. मुलींना शाळेत शिकवण्या अगोदर सावित्रीमाईनी ज्योतिबा फुले यांच्याकडून शिक्षणाचे धडे घेतले.

पण त्याकाळी मुलींना शिकवणे हे इतके सोपे नव्हते. त्यांना लोकांच्या कडक विरोधाचा सामना करावा लागला. सावित्री माई शाळेत जात असताना धर्माचे आणि स्त्री शिक्षणाचे विरोधी लोक कचरा , गाळ, आणि शेण त्यांचावर टाकत. यामुळे सावित्री माईंचे कपडे घान व्हायचे , म्हणुन त्या आणखी एक साडी आपल्या सोबत घ्यायच्या आणि शाळेत आल्यावर ती साडी बदलत असे.इतके असूनही त्यांनी हार मानली नाही. स्त्री बालहत्या रोखण्यासाठी त्यांनी नवजात मुलांसाठी एक आश्रम ही उघडल. त्यानंतर सावित्रीमाई फुले यांनी माघे फिरून पाहिले नाही. त्यांच्या जीवन काळात त्यांनी पुण्यात १८ महिला शाळा उघडल्या. जोतिबा फुले हे स्वतः अध्यक्ष होते आणि सावित्रीमाई फुले या महिला विभागाच्या प्रमुख होत्या.जोतिबा फुले यांनी जन्मभर खालच्या जाती, महिला आणि दलीत यांच्यासाठी काम केले. या कामात सावित्रीमाई फुले आणि त्यांचे पती ज्योतिबा फुले यांनी मोलाची कामगिरी केली.

सावित्रीमाई फुले यांनी स्त्री कल्याणासाठी देखील खूप कार्य केले. त्यांनी स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबावे यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी आपल्या पती समवेत काशीबाई नावाच्या विधवेचा स्वीकार केला आणि तिला आपुलकी दिली. नंतर त्यांनी यशवंत नावाच्या मुलाला दत्तक घेतले. त्याला चांगले संस्कार व शिक्षण दिले. तो मुलगा नंतर मोठा डॉक्टर झाला. सावित्रीमाई फुले मुळे आज प्रत्येक घरातील मुली शिकत आहेत. सावित्रीमाई शिकल्या म्हणून मुलींना स्वतःचा हाक निर्माण करता आला.

सावित्रीमाई फुले यांनी प्रत्येक महिलांचे जीवन जगणे सोपे केले आहे. आज प्रत्येक जागी स्त्रीला मान दिला जात आहे म्हणून त्या खूप मेहनत करत आहेत. पहिल्या कली स्त्रियांना शिक्षण घेण्याचे, मनसोक्त जगण्याचे अधिकार नव्हते आणि आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियाच अव्वल आहेत. त्यांच्यामुळेच आज सर्व क्षेत्रात स्त्रियांना स्वातंर्त्य आहे. सावित्रीमाई शिकल्या नसत्या तर आजही स्त्रिया चूल आणि मूल यातच गुंतून राहिल्या असत्या.

सावित्रीमाई फुले या अगदी नऊ वर्षांच्या असताना त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी लाऊन देण्यात आला. परंतु त्यांना स्त्रियांवरील बंधने मुळीच मान्य नव्हती. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार थांबावे यासाठी स्त्रियांचे कल्याणासाठी काम करायला सुरु केले. त्यांना माहिती होते की जर स्त्रियांना समाजात मान, संमान मिळवून द्यायचा असेल, त्यांच्यावरील अत्याचार थांबवायचे असतील तर त्यांना अगोदर शिक्षित करणे खूप गरजेचे आहे. म्हणून त्यांनी पुण्यातील भिडे गुरुजी यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. सावित्रीमाई फुले या लेखिका आणि कवयत्री सुद्धा होत्या. त्यांनी १८५४ मध्ये काव्यफुले आणि १८९२ मध्ये बावन काशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि "जा शिक्षण मिळवा" नावाची कविता प्रकाशित केली. ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतः ला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले.

त्यांनी महिलांसाठी निवारा स्थान उघडले जिथे ब्राह्मण विधवा त्यांच्या मुलांची साक्षी तकणे प्रसूती करू शकत होत्या. सावित्रीमाई आणि ज्योतिरावांनी सती प्रथेला कडाडून विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि वंचित मुलांसाठी आश्रमाची स्थापना केली. सावित्रीमाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी खूप मोलाचे योगदान दिले आहे.

## रेल्वे गाड्यांतील अनाधिकृत फेरीवाले आणि तृतीयपंथींना २२.४३ लाखाचा दंड

**गोंदिया:** रेल्वे संरक्षण दल, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्यागोंदिया रेगल्वे सुरक्षा बलाने सन २०२३ या वर्षभरात केलेल्या कारवाईत अनधिकृत फेरीवाले, विक्रेते आणि पैसे मागणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. वर्षभरात २ हजार ९०८ बेकायदेशीर विक्रेते व तृतीयपंथी यांना पकडून कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्यांना २२ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा दंड ठोठवला आहे. तो दंड वसूल करण्यात आला.

रेल्वे प्रवाशांचा सुरक्षित प्रवास करण्याच्या उद्देशाने विभागीय सुरक्षा आयुक्त दीपचंद्र आर्य यांच्या मार्गदर्शनाखाली २०२३ मध्ये रेल्वे कायद्याच्या विविध कलमांतर्गत सतत मोहीम राबविली. रेल्वे आरक्षित ई-तिकीटांची बेकायदेशीर दलाली, रेल्वेस्थानक आणि गाड्यांमध्ये खाद्यपदार्थांची अनाधिकृतपणे विक्री, विनाकारण चेन पुलिंग आणि गाड्यांमधील ज्वलनशील पदार्थांची अनाधिकृत वाहतूक रोखण्यासाठी या मोहिमेअंतर्गत तपासणी व कायदेशीर कारवाई करण्यात आली. वर्षभरात ८ हजार ७६३ जणांवर कारवाई करण्यात आली. यात ८ हजार ७६४ आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती गोंदिया रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक विनोदकुमार तिवारी यांनी दिली आहे.

**ई-तिकीटांचा काळाबाजार करणाऱ्या ९८ जणांना पकडले**

रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अन्वये कारवाई करुन एकूण ९६ प्रकरणांमध्ये ९८ दलालांना अटक करुन न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने ३८ प्रकरणांमध्ये निकाल देऊन ३ लाख ५६ हजात रूपये दंड ठोठावला. तर १८ प्रकरणे प्रलंबित असून ४० प्रकरणांचा तपास प्रलंबित आहे.

**चेन पुलिंग करणाऱ्या ६७७ जणांना पकडले**

विनाकारण ट्रेनमध्ये साखळी ओढताना आढळून आलेल्यांवर कारवाई करताना ७०२ प्रकरणात एकूण ६७७ जणांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने २ लाख ८३ हजार ७० रूपये त्यांच्यावर ठोठावला.

**ज्वलनसील पदार्थ नेणाऱ्या २४ जणांना अटक**

रेल्वेस्थानक आणि रेल्वे गाड्यांमध्ये ज्वलनशील पदार्थाची अनधिकृत वाहतूक केल्याच्या २१ प्रकरणांमध्ये एकूण २४ जणांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्यांना एकूण १४ हजाराचा दंड ठोठावला.

## आयुष्यमान भारत योजने अंतर्गत अंडवृद्धी शस्त्रक्रिया होणार मोफत

**गोंदिया:-** राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत हत्तीरोग दूरीकरण मोहिम अनुषंगाने अंडवृद्धी शस्त्रक्रिया आयुष्यमान भारत योजने अंतर्गत मोफत करुन घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी गोंदियावासियांना केले आहे.




आयुष्यमान भारत योजना किंवा प्रधानमंत्री जन आरोग्ययोजना ही केंद्र सरकार पुरस्कृत योजना "सन २०१८ मध्ये सुरू केली आहे. या योजनेमध्ये केंद्र सरकार गरीब कुटुंब व शहरातील गरीब लोकांच्या कुटुंबांना आरोग्य विमा उपलब्ध करते. याद्वारे रुग्णालयातील ५ लाखापर्यंत मोफत उपचार मिळू शकतो त्यासाठीची आवश्यक पात्रता विहित करनेत आलेली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली आहे.

हत्तीरोग हा एक दुर्लक्षित असा आजार असून यामध्ये हत्तीपाय आणि अंडवृद्धी ही लक्षणे दिसून येतात. अंडवृद्धी या आजारासाठी रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करुन या आजाराचे प्रमाण निश्चित कमी करता येते. जिल्हात ५६२ अंडवृद्धी रुग्णांची नोंदणी झाली असुन १०० टक्के नोंदणी झालेल्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया होण्यासाठी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयामध्ये सदर शस्त्रक्रिया मोफत होणार असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांनी दिली आहे.

महात्मा जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत पाच लाखापर्यंतचे उपचार आरोग्य विमाच्या माध्यमातून मोफत होतात. त्यामुळे उपचारापूर्वी आपले नाव आयुष्यमान भारत योजनेत समाविष्ट आहे का? याची खात्री करणे आवश्यक आहे त्यांना पाच लाखापर्यंत आरोग्य विमा मोफत मिळणार आहे. त्यामुळे सर्व अंडवृद्ध रुग्णांनी सर्वप्रथम निकषानुसार आयुष्यमान भारत कार्ड काढुन घ्यावे व हे कार्ड काढलेनंतर त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही जवळच्या अंगीकृत रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करुन घेण्याचे आवाहन डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांनी केले आहे. याबाबत कुठलीही अधिक माहिती साठी जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधन्याचे आवाहन जिल्हा हिवताप विभागाने केले आहे.

**कोणत्या अंगीकृत रुग्णालयात होणार शस्त्रक्रिया**

या योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात एकूण अकरा रुग्णालय अंगीकृत असून त्यापैकी सहा शासकीय व पाच खाजगी रुग्णालय आहेत. यात गोंदिया शहरातील न्यू गोंदिया हॉस्पिटल, ब्राह्मणकर हॉस्पिटल, बाहेकर हॉस्पिटल, बालाजी नर्सिंग होम, रिलायन्स हॉस्पिटल तर शासकीय कुवर तिलक सिंह सरकारी रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय तिरोडा, ग्रामीण रुग्णालय देवरी, ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव, ग्रामीण रुग्णालय सडक अर्जुनी यांचा समावेश आहे.

# निवडणुकीच्या गोंधळात,बळीराजाची वाट लागली

निवडणुकीचे वारे वाहत असताना जस-जशी वेळ जवळ येत आहे, तस-तसा रणांगणातील स्पर्धकांचा जोश वाढत राहतो . जाती-धर्माच्या रथयात्रा निघून नवीन राजकीय पाट्या लागत आहेत.तर कुठे शेतकरी-शेतमजुराचे तारणहार फक्त आम्हीच, असा तमास्या दाखविल्या जात आहे. सध्याच्या लोकशाहीत अनेक वीचाराचे राजकीय किडे प्रकाश झोतात येण्यासाठी आपापल्या परीने डावपेच आखतात. आता सद्यातरी सत्तेतून फक्तं स्वार्थ एव्हढीच संधीसाधू राजकीय भूमिका तयार झाली . शासकीय तिजोरी लुटण्याचा मोह राज्यकर्त्यांना आवरत नाही, त्यासाठीच फक्त राजकीय पक्षांची धडपड चालू आहे. आम आदमीच्या भविष्याची चिंता आता कोणत्याही राजकीय पक्षाला राहिली नाही. शेतकऱ्याचा उपयोग फक्त उत्पादन वाढवून शहरे पोसण्यासाठी केल्या जात आहे. आवश्यकता नसताना शेतमालाची आयात करून शेतकरी लुटल्या जातो. औद्योगिक प्रगतीच्या नावावर फक्त भांडवलशाही पोसल्या जाते. कमिशनची पोपटपंची चालवील्या जात आहे. कोविडच्या दोन वर्षे काळात कोणतेही वस्तूचा पुरवठा कमी पडला नाही. म्हणजेच औद्योगिक पुरवठा या देशात भरपूर आहे. जागतिक बँकेचे कर्ज दरडोई दिवसेंदिवस प्रत्येक नागरिकांच्या डोक्यावर वाढत असतांना, तिकडे डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाली. या सर्व बाबीला दुरुस्त करण्यासाठी आता सत्ताधीशांना व्यवस्था दुरुस्तीसाठी दिवसातील तीन टाईम (सकाळ, दुपार,संध्याकाळ ) औषध घ्यावे लागेल, तेव्हाच यांच्या बुद्धिमत्ता जागेवर येतील.

काही राजकीय पक्ष नुसतं धर्मांध भुकेचे शिकार झालेत. निवडणूक होईपर्यंत भागवत सप्ताह, प्रवचन, शिवपुराण कथा, धार्मिक मेळावे घेऊन, मंदिरात जाण्यासाठी, रामलल्ला च्या नावावर अयोध्येच्या दर्शनाच्या रांगा लागत आहेत. जाती-धर्माच्या नाववर अशिक्षितांना व सुशिक्षिताना सुद्धा गुलाम बनविले जात आहे. अनेक जुने युगातील पुरानाचे पुरावे देऊन आजचे धंदेवाईक महंत यांत्रिक-विज्ञान युगातील तरुणांचे डोके,जाती-धर्माच्या विचाराने भडकविल्या जात आहे. मंदिर मज्जिद च्या नावावर राजकीय दुकाने थाटली जात आहे. अन कदाचित निवडणुकी प्रसंगी मंदिर-मज्जिद वाद उखरल्या जातील. मुस्लिमाना टार्गेट करुन मतदनाचे उल्लु सिधे केल्या जातील. लोकंसख्येने अल्प असलेल्या मतदारसंघात सुद्धा मुस्लिम निवडून येत आहे, अशी हवा पसरविल्या जातील. आणि मागचा पुढचा विचार न करता सरळ हिंदू एकत्र येऊन निवडून आणण्याचे डावपेच आखल्या जातील. मराठा-कुणबी-ओबीसीचा संघर्ष दिवसेंदिवस आणखी पेटवलेला दिसेल. वास्तविक निवडणुकी झाल्यावर कोणीही आरक्षणाचे नाव सुद्धा घेणार नाही. निवडणुकीच्या निमित्ताने पाखंडी विचार डोक्यात भरल्या जात आहे.

मुस्लिम हेच लोक अतिरेकी आहेत हे मुद्दामून निवडणुकीच्या काळात भासविले जाते, बॉम्ब स्पोट घडल्याची उदाहरणे सुद्धा आपण पाहिली आहेत. व देशपातळीवर आर्थिक धोरणाचा विचार न होता फक्त जनतेचे लक्ष विचलित करणे हेच निवडणूकीचे ध्येय झाले. शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबत कोणताही राजकीय पक्ष गांभीर्याने दखल घेत नाही, ही एक या राजनीतीतली मोठी शोकांतिका आहे. निवडणुकीच्या काळात जाती- जातीचे आपापल्या सोईनुसार दुकाने उघडणार आहे. जसे मराठा-कुणबी-ओबीसी समाजाची भांडणे उभी करून, संपूर्ण राजनीतित गोंधळ उडालेला दिसतो आहे. तर जाती- जातीत आरक्षणाचा प्रश्न पेटवण्याचे चिन्ह दिसत आहेत. कोणी आरक्षणाच्या विषयाला जीवन मरनाचा प्रश्न समजेल, तर काही त्याचे राजकीय भांडवल करतील.



शरद जोशी म्हणायचे ---

या देशात संत-महात्म्याचे पुतळे सोन्याचे उभे होतील, घरावरील कवले सोन्याचे करतील पण हे राज्यकर्ते शेतीमालाचे भाव वाढवीणार नाहीत? .

जागतिक पातळीवर आर्थिक धोरणाचा विचार न होता, सत्तेच्या गणितासाठी आपली संख्या कशी वाढेल, त्यासाठीच फक्त क्लुप्त्या खेळल्या जात आहे. म्हणजे सत्ता हा चिल्लर शाहीचा गोरख धंदा झाला आहे.

ना हिंदू खत्रे मे है, ना मुस्लिम खतरे मे है, आज तो सिर्फ किसान खत्रे मे है.

सतत तेच ते आमदार-खासदार जनतेनी निवडून पाठविले, त्यामुळे त्याच त्या घराणे शाहीतले कुटुंब अब्जोपती झाले. त्यामुळे, घराणेशाहीने देशावर ताबेदारी करुन आपली जहागिरी वाढविली. शासकीय तिजोरीचे लुटारू तुरुंगातून शुद्ध होऊन पुन्हा जनतेसमोर डरकाळ्या फोडत आहेत. आणि अशा पद्धतीने जनतेनी घराणेशाहीवर शिक्का मोर्तब करुन, आपल्याच पायावर गोटा पाडून घेतला. कारण घराने शाहिने तिजोऱ्या भरून पुढील राजनीतीच्या वाटचालीसाठी उमेदवारांना गुलाम बनविणे सुरू केले, उमेदवाराच्या लाचारीत जनता सुद्धा गुलाम बनवीली जात आहे. आणि या घराणे शाहीच्या ऊन्मादात नवीन दरोडेखोर तयार झालेत. एकदा पक्षप्रतिनिधी झाला की तो पंडित जवाहरलाल नेहरूच्या कारकिर्दीत झालेला परिशिष्ट नऊ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार शेतकरी विरोधी धोरणे वापरतो. चार वर्ष शेतकऱ्यांना, शेतमजुरांना लुटतो व निवडणुकीच्या शेवटच्या वर्षी जनतेला सहानुभूतीचे टोकन हाती देतो. शेतीमालाचे भाव वाढले की, महागाईवर मोर्चे काढणारे दलाल तयार होतात. शेतकरी हिताचे कायदे किंवा शेतीवरील निर्बंध हठविल्या शिवाय शेतकरी आत्महत्या आतातरी थांबणार नाहीत. आणि हे काम आमदार-खासदारांना करावे लागेल. पण आजचे भावी आमदार-खासदार तर तिकीट मागण्यासाठी पाया पडून रांगेत उभे आहेत. कारण निवडणुकीचा खर्च हे राजकीय पक्ष लुटलेल्या पैशातून पक्ष प्रतिनिधींना वाटतात. त्यामुळे हेच भामटे गुलाम व्हायला निघाले तर शेतकरी कसा दुरुस्त होईल? आर्थिक धोरणे दुरुस्त कसे होतील. पण आज तरी आजी व माजी आमदार-खासदारांची ती मानसिकता नाही.

ज्या आमदार-खासदाराच्या दोन-चार टर्म झाले तरी तो पुन्हा मतदान मागत असेल, तर त्याला मतदारांनी चांगला चोप दिल्याशिवाय हि व्यवस्था दुरुस्तच होणे नाही. आयात- निर्यात धोरणे शेतकऱ्याच्या बाजूने न होता भांडवलशाहीच्या बाजूने निर्णय घेतले जातात. हेच आमदार मंत्री जर शेतकरी हिताचे धोरणे वापरत नाही तर यांचा आता शेतकऱ्यांनी मुलाजा, विचार करण्याची काय गरज?. चिल्लरकीचा गोरख धंदा करण्यासाठीच तर मुख्यमंत्री पंढरपूरला येऊन पांडुरंग देवाला साकडे घालतो?.

देवा यावर्षी पाऊस येऊ दे, व शेतकरी सुखी होऊ दे पांडुरंग म्हणतो मी तर तुला मुख्यमंत्री केले आहे. तुझ्याच हातात मी सत्ता व अधिकार दिले आहेत, आणि तू फक्त पंढरपुरात येऊन फोटोसेशन करतो व जनतेला चुवत्या बनवीतो. पंढरपुरात येऊन मागणी करणे म्हणजे पंढरीचा पांडुरंग हे काय नाटक कंपनी आहे कांय? तूझे अधिकार मुंबई-दिल्लीत जाऊन वापरत नाही, तू कायदे, धोरणे बदलत नाही आणि जनतेला फसविण्याचे काम इथे येऊन करतो. म्हणून यापुढे आता पंढरपुरात कार्तिक आणि आषाढी एकादशीला मुख्यमंर्त्यांनी माझ्या भेटीला येऊ नये ,असा पांडुरंगाने मुख्यमंर्त्याला सल्ला दिला पाहिजे ?

"जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती, देह कष्टविती उपकारे." यासाठी संत, महंत, कीर्तनकार पंढरपुरात माऊलीच्या दर्शनासाठी पायी येतात. शेतकरी हा पंढरपुरात येऊन सुखी होणार नाही, तर तो आपल्या दुःखाच्या याचना पंढरीनाथाला सांगतो. शेतकरी मुंबई, दिल्लीत बसून आर्थिक धोरणाचे बदल केले तर तो सुखी होईल. केंद्रात पडून असलेले शेतकरी अहवाल आमदार खासदारांनी आवाज उठवून पास केले, तर शेतकरी सुखी होइल. पंढरपुरात येऊन शेतकरी सुखी होऊ दे, असे वारकऱ्यांनी, शेतकऱ्यांनी, अन मुख्यमंर्त्यांनी कितीही वर्ष म्हटले तरी शेतकरी सुखी होणार नाही. हे पांडुरंगाला माहित आहे. म्हणून विठ्ठल भक्तांनी, व वारकऱ्यांनी आता मुख्यमंत्र्याला पंढरपुरात आल्यावर जाब विचारल्याशिवाय राहु नये. मुख्यमंत्र्याला जर शासकीय संरक्षण नसते तर, जनतेनी पंढरपुरातून मुंबईची टपाल वापस पाठविली असती. मुख्यमंत्र्याला सुद्धा हाकलून दिले असते. गळ्यात हार टाकताना मुख्यमंत्र्याच्या कानात पांडुरंगाने मंत्र जर सांगितले असते, आर्थिक धोरणे बदलून घेतली असती, तर एवढ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नसत्या?. व भारताला शेतकरी आत्महत्येचा कलंक सुद्धा लागला नसता?

आजच्या परिस्थितीत शेतकऱ्यांचे राज्य भविष्यात येईल ही संकल्पनाच धुळीस मिळत आहे. आयात-निर्यात धोरण चुकीचे वापरुन, शेतकरी व्यवस्था डबघाईस आणणे, हा यांचा गोरख धंदा झाला आहे. त्यासाठी आता जुन्या व्यवस्थेलाच सत्तेतून हाकलने एवढेच शिल्लक राहिले. तरच पुढे शेतकरी जिवंत राहील. कॉंग्रेसने सुद्धा स्वतःला धर्मनिरपेक्ष समजून शेतकरीच खतम करण्याचे धोरणेच आखली. आज पर्यंत शेतकरी आत्महत्या घडविण्याचे दोन्ही राजकीयपक्षाचे गोरखधंदे आता उघड झालीत .

तसेच जाहीरनाम्यापासून सुद्धा मतदारांना आता सावध व्हावे लागेल. राजकीय पक्षाचे (उदा.कॉंग्रेस, बीजेपी किंवा अन्य पक्षाचे) जाहीरनामे फसवेगिरीचे असल्यास निवडणूक आयोग किंवा सुप्रीम कोर्टात जनहित याचिका (अपील) दाखल होत नाही, तर ती मतदाराची शुद्ध फसवणूक असते. निवडणूक जाहीरनामा हा फक्त मतदार आणि राजकीय पक्षाच्या चर्चेचा विषय असतो. निवडणूक जाहीरनामा अमलात आणण्यासाठी कुठलाही कायद्याचा आधार नाही. (उदा. गरिबी हटावचे नारे, अच्छे दिन, मतदारांच्या खात्यात १५ लाख रुपये जमा होतील, शेतीमालाला उत्पादन खर्च+५० टक्के नफा या सर्व बाबी राजकीय पक्षाच्या फसवेगिरीच्या घोषणाच होत्या ना? ) म्हणूनच आता म्हणावेसे वाटते...

कॉंग्रेस-बीजेपी हटाव ,भारत देश बचाओ, भारत देश बचाओ, भारत देश का किसान बचाओ.

आमदार, खासदार- मंत्री हे तर या राजकीय पक्षांचे एजंट व दलाल झालेत. तेव्हा या निवडणुकीच्या गोंधळातून आता जनतेलाच सावध होऊनच निर्णय घ्यावा लागेल ? या सर्व बाबीचा विचार नक्कीच मतदारांनी केला तरच लोकशाही टिकेल व शेतकरी आत्महत्या थांबतील?.

**धनंजय पाटील काकडे.**

९८९०३६८०५८.

अध्यक्ष- शेतकरी-वारकरी, कष्टकरी महासंघ, महाराष्ट्र राज्य.

सरसेनापती-शेतकरी आंदोलन समिती

# आदिवासी भागातील गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

## गोंदिया पोलीस दलाचा कल्याणकारी नाविण्यपूर्ण स्तुत्य उपक्रम



**गोंदिया :** गोंदिया जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्ह्यातील जनतेच्या हिताकरीता (विशेषतः नक्षलग्रस्त भागातील जनतेच्या कल्याणाकरीता) कायम अग्रेसर राहुन विविध कल्याणकारी नाविण्यपूर्ण उपक्रम वेळोवेळी राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या संकल्पनेतुन तसेच अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या मार्गदर्शनाखाली नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील दुर्गम, अतिदुर्गम भागातील गोरगरीब, आदिवासी भागात वास्तव्यास असणाऱ्या आणि शाळा–कॉलेजच्या शिक्षणाकरिता ५ ते १० कि. मी. पायी पायी ये–जा करणाऱ्या अशा गरजु गरिब व आदिवासी मुलींना पायी ये–जा करण्याचा त्रास सहन करावा लागणार नाही, जेणेकरुन त्यांचा वेळ वाचुन त्यांना शिक्षणाकरिता भरपुर वेळ मिळुन अभ्यासाला वाव मिळेल व त्यांचे आरोग्य सुदृढ राहुन त्यांचा सर्वांगीण विकास होईल आणि पोलीस व जनता यांच्यातील आपुलकीची भावना निर्माण होण्यास चालना मिळेल यादृष्टीने गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या पुढाकाराने रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ ईस्ट, तसेच माऊली मित्र मंडळ नागपूर यांच्या सौजन्याने २७ डिसेंबर २०२३ रोजी पोलीस स्टेशन सालेकसा येथे पोलीस स्टेशन अंतर्गत येणारे सशस्त्र दुरक्षेत्र पिपरीया, बिजेपार व दरेकसा येथील गरजु शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

गोंदिया जिल्हा पोलीस दल आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ ईस्ट, तसेच माऊली मित्र मंडळ नागपूर यांच्या सौजन्याने आयोजित कार्यक्रमाअंतर्गत अतिदुर्गम आदिवासी भागातील गरजू गोरगरीब विद्यार्थ्यांना पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ ईस्टचे प्रेसीडेंट राजीव वरभे, माऊली सेवामित्र मंडळाचे अध्यक्ष सुहास खरे यांच्या हस्ते सायकलींचे वाटप करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, तसेच रोटरी क्लब साऊथ ईस्ट नागपूरचे प्रेसीडेंट राजीव वरभे, माऊली सेवामित्र मंडळाचे अध्यक्ष सुहास खरे यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना १५ सायकलींचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील अतिदुर्गम आदिवासी भागातील इतर ८ सशस्त्र दूरक्षेत्र अंतर्गत गोरगरीब गरजू आदिवासी विद्यार्थ्यांना ४० सायकलींचे वाटप करण्यात आलेले असुन सदर कार्यक्रमा अंतर्गत जिल्ह्यात एकूण ५५ सायकलींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी संकेत देवळेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन सालेकसा येथील पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, चालक पोलीस नायक रितेश अग्नीहोत्री, पोलीस शिपाई जितेंद्र पगरवार, पोलीस शिपाई प्रिती उके तसेच नक्षल प्रोपोगंडा सेल गोंदिया येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे, पोलीस हवालदार लियोनार्ड माटीन, पोलीस शिपाई भास्कर हरिणखेडे यांनी परिश्रम घेवून विशेष योगदान दिले आहे.

# दालोरा खिडकी योजनेंतर्गत अतिदुर्गम गावातील लोकांना ड्रायव्हिंग लायसन्सचा लाभ

## गोंदिया जिल्हा पोलीस दलाचा स्तुत्य उपक्रम




**गोंदिया :** महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगड या तीन राज्यांच्या सीमा जेथे एकवटतात असे गोंदिया जिल्ह्यातील अतिदुर्गम व घनदाट जंगलात वसलेले सालेकसा तालुक्यातील मुरकुटडोह, दंडारी व टेकाटोला या आदिवासी बहुल गावातील लोकांकडे मोटार सायकल चालवितांना आवश्यक असलेले ड्रायव्हिंग लायसन्स नसल्यामुळे त्यांना गोंदिया येथे दूरवर जावे लागत असल्याने बहुतांश लोकांनी लायसन्स काढलेले नव्हते. ही बाब लक्षात घेवून सदर गावातील नागरिक हे नक्षलवादाकडे न वळता समाजातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या संकल्पनेतून अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दादालोरा खिडकी योजनेअंतर्गत (एक हाथ मदतीचा) आज उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ९२ लोकांना ड्रायव्हिंग लायसन्सचा लाभ देण्यात आला.

पोलीस दादालोरा खिडकी योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील मुरकुटडोह येथे मोटार सायकल चालक परवाना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर यशस्वी होण्याकरीता मागील दोन महिन्यापासून केलेल्या तयारीत अतिदुर्गम भागातील प्रत्येक गावांना वारंवार भेटी देवून, कार्यशाळा आयोजित करुन व मोटार वाहन कायद्याची माहिती देवून मोटार सायकल चालक परवाना काढण्याकरीता आवश्यक असलेली कागदपत्र प्राप्त केली होती. तसेच ग्रामस्थांचे ड्रायव्हिंग लायसन्स बनविण्याचे ऑनलाईन अर्ज उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गोंदिया यांचेकडे सादर करण्यात आले होते. त्यानुसार आज बेस कॅम्प, मुरकुटडोह हद्दीतील ९२ लोकांचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हिंग लायसन्स काढण्यात आलेले असून सदर कार्यक्रम पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल ताजने व सहायक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वीरित्या पुर्ण झाले आहे. गोंदिया जिल्हा पोलीस दलाचा हा स्तुत्य उपक्रम असून सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेमुळे पोलीस प्रशासनाप्रती ग्रामस्थांमध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.

कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल ताजने, सहायक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहायक पोलीस निरीक्षक (मुरकुटडोड) दिनेश बागुल, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे (नक्षलसेल), पोलीस हवालदार चित्तरंजन कोडापे व लियोनार्ड माटीन यांचेसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जादुटोणा विरोधी कायदा अशासकीय सदस्याकरिता अर्ज आमंत्रित

भंडारा,:जिल्हास्तरीय जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार करण्यसाठी अशासकीय सदस्यांकरीता सहायक आयुक्त,समाजकल्याणकडुन अर्ज आमंत्रित करण्यात येत आहे. यासाठी अर्जदार भंडारा जिल्हयातील रहिवासी असावा,तसेच वय किमान २५ वर्षे असावे,व अर्जदाराने अर्ज करतांना पोलिस विभागाकडून स्वच्छ चारित्र पडताळणी करावे.

# स्नेह संमेलन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांसाठी पोषक-एड.टी.बी.कटरे




**गोरेगाव: –** विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांना वेळेनुसार समाजासमोर आणने आवश्यक आहे. शालेय जीवनात स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे कला गुण, कौशल्य समाजासमोर प्रदर्शित करण्याची संधी मिळतो. शिक्षणासोबतच क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागिता विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्व विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. स्नेह संमेलन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांसाठी पोषक आहे, असे प्रतिपादन एड.टी.बी.कटरे यांनी केले. ते येथील पी.डी.रहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव व पी डी आर कान्व्हेंट येथील वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी दि.२८ डिसेंबरला बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ टी.पी.येळे, माजी प्राचार्य पी.एफ.बघेले, खेमेंद्र कटरे, हि.दा.येळे,बा.डो. पटले, डी.डी.रहांगडाले, दुर्गाप्रसाद राहांगडाले, प्राचार्य सी.डी.मोरघडे, पर्यवेक्षक ए.एच.कटरे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धा, अपूर्व विज्ञान मेळावा, रांगोळी व पुष्पगुच्छ स्पर्धा, सामुहिक नृत्य व नाटकाचे आयोजन करण्यात आले. २९ डिसेंबरला साँस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.संजय येळे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.वैभव एस.तुरकर यांच्या हस्ते होणार आहे. मुख्य अतिथी म्हणून डॉ.जितेंद्र येळे,डॉ.साक्षी वैभव येळे, यांच्यासह तालुक्यातील मुख्याध्यापक उपस्थित होते.

३० डिसेंबरला बक्षिष वितरण कार्यक्रम डॉ.विजय टी.कटरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.ओम टी.बघेले यांच्या हस्ते उदघाटन झाले. मुख्य अतिथी म्हणून डॉ.स्विटी बघेले, शिक्षक पालक संघाचे श्रीमती शारदाताई रहांगडाले, लक्ष्मीताई रहांगडाले,सीमाताई कटरे,कु.कविता लिचडे, श्रीमती कलावती जायस्वाल, रजनीताई पालेवार, आशाताई अगडे यांच्यासह परिसरातील गावचे गणमान्य सरपंच उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक प्राचार्य सी.डी.मोरघडे यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.सी.आर.बिसेन, सौ.एम.डी. रहांगडाले, सौ.ए.एस.बावनथडे, कु. एस.आर.मांढरे, सौ.जयश्री पारधी, कु.एस.जी.दमाहे, प्रा.डी.बी.चाटे, प्रा.एस.एम.नंदेश्वर, प्रा.डी.एम.राठोड, सौ.एस.पी. तिरपुडे, आर.टी.पटले, वाय के चौधरी, आर.वाय.कटरे, जी.डब्लू. राहांगडाले, एस.आर. राहांगडाले, प्रा.ए.जे.सोरले, भुमेश राहांगडाले, प्रा.जे.वाय.बिसेन, सौ.भुमेश्वरी राहांगडाले, एम.बी. कोटांगले, झेड.सी. राऊत व विद्यार्थी प्रतिनिधी मोहित गौत, आलेमा पठाण, आरती शेंद्रे, दिया येळणे, रोशनी सरजारे तस्लीम कुरैशी, यांनी सहकार्य केले.

# सावित्रीमाई फुले यांच्या जयंती दिनी “शिक्षण वाचवा परिषद”



**गोंदिया:–** मूलभूत हक्क म्हणून मोफत शिक्षणाची सोय आमच्या भारतीय राज्यघटनेत करून देण्यात आलेली आहे. पण शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे १५ हजार शासकीय शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. ०१ जानेवारी १८४८ ला मुलींची पहिली शाळा ज्योतीबा–सावित्री ने स्थापित करून क्रांतिकारी सुरुवात केली. हा महामानवांचा वारसा कायम ठेवणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना कठीण होत असलेले शिक्षण व बंद होत असलेल्या शासकीय शाळा वाचविण्यासाठी प्रयत्न होणे काळाची गरज आहे. क्रांती.सावित्रीमाई फुले यांच्या जयंती दिनी शिक्षण वाचविण्यासाठी संकल्प करणे, ठोस पाऊल उचलणे तसेच वर्षभर प्रयत्न उपाययोजना करणे आवश्यक आहे. सत्य ओळखून असाच एक दृढ संकल्प– प्रयत्न– संयुक्त संघटीत पणे

शिक्षण वाचवा मोहीम–संविधान जागृती अभियान अंतर्गत क्रांती. सावित्रीमाई फुले, मुक्ता साळवे, फातिमा शेख व राजमाता जिजाऊ जयंती तसेच मुलींची प्रथम शाळा स्थापना दिना निमित्ताने संविधान मैत्री संघ, सावित्रीमाई फुले विचार मंच गुदमा शिक्षण बचाव समन्वय समिति– पुरोगामी प्रबोधन चळवळ यांच्या संयुक्त माध्यमातून “जिल्हास्तरीय शिक्षण वाचवा परिषद” दि. ०३ जानेवारी २०२४ बुधवारला, ग्रामपंचायत पटांगण परिसर गुदमा ता. जि.गोंदिया येथे करण्यात येत आहे.

संविधान जागृती अभियान समन्वयक प्रा. डॉ. दिशा गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या शिक्षण वाचवा परिषदेत मार्गदर्शक म्हणून शिक्षण बचाव समन्वय समितीचे अध्यक्ष रमेश बिजेकर, ओबीसी महिला महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुषमा भड, पुरोगामी प्रबोधन चळवळीचे रवि हाडे, विचारवंत शब्बीर पठाण, ज्येष्ठ नागरिक साहित्यिक वसंत गवळी, सी.पी. बिसेन, वन स्टॉप क्रायसिस सेंटर समुपदेशक समिना खान, संविधान मैत्री संघाच्या पौर्णिमा नागदेवे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

सर्व नागरिकांच्या साक्षीने हा संकल्प कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तसेच वर्षभर शिक्षण वाचवा–शाळा वाचवा मोहीम राबवून गावागावात जनजागृती सहकार्य करण्याचे आवाहन क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले विचार मंच गुदमा व संविधान मैत्री संघातर्फे करण्यात आले आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत कबड्डीमध्ये चिचगड प्राथमिक शाळेने पटकाविला प्रथम क्रमांक



**चिचगड:–** नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात देवरी तालुक्यातील चिचगड येथील प्राथमिक मुलांच्या कबड्डी संघाने प्रथम पुरस्कार पटकाविला. जिल्हा क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव घेण्यात आले.

देवरी तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा चिचगडच्या मुलांनी कबड्डीच्या सामन्यात प्रथम क्रमांक पटकाविला.सांघिक विविध वैयक्तिक स्पर्धेत देखील देवरी तालुका प्रथम क्रमांक घेऊन पुढे राहिला. प्राथमिक मुले उंच उडीमध्ये जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा चिचगडचा विद्यार्थी अंश दीपक भोयर यांने प्रथम कमांक पटकाविला.

यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन गट शिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे, मुख्याध्यापिका शारदा अंबादे, महेंद्र टेंभुर्णे, वर्षा टेंभुर्णे ,दीक्षांत धारगावे, केसव लोकनार, प्रगती निखाडे सुभाशिनी सोनटक्के, मीना सूर्यवंशी, सरपंच व पोलीस पाटील पालक व तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पालक यांनी अभिनंदन केले.

# ८० ऐवजी ७० टक्केच भरणार जागा

## जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची पुन्हा कमतरताच:शिक्षक संभ्रमात

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक आणि इतर पदे भरली जाणार आहेत. मात्र आता पदभरतीत कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. ८० पैकी ७० टक्केच जागा भरण्यात येणार आहेत. त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र देखील पोहोचले आहे.यामुळे भावी शिक्षकांत संभ्रमाची स्थिती आहे.

रिक्त असलेल्या जागांसाठी येत्या काही महिन्यांत शिक्षक भरती होणार आहे. रिक्त जागांपैकी ८० जागांवर भरती होणार होती. मात्र, आता रिक्त जागांवर ७० टक्केच भरती होणार आहे. त्यामुळे भावी गुरुजींमधून नाराजीचा सूर उमटत आहे. शिक्षक भरतीसंदर्भात शिक्षण आयुक्तांनी काही दिवसापूर्वी पवित्र पोर्टलवर रिक्त पदांच्या जाहिराती प्रसिद्ध कराव्यात, अशी सुचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना केली होती. मात्र विधीमंडळाच्या नागपूर अधिवेशनात शिक्षक भरतीसंदर्भात बिंदुनामावलीतील दुरुस्तीबाबत आमदारांनी प्रश्न उपस्थित केले. त्यासंदर्भात कारवाई करणे आवश्यक आहे. जून २०२३ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार शिक्षकांच्या रिक्त पदांच्या ८० टक्के पदे भरण्यास दिलेल्या परवानगीनुसार सर्व पदे भरावयाची आहेत. मात्र, बिंदूनामावलीसंदर्भात काही वैध, आक्षेप किंवा तक्रारी असल्याने शासनाच्या परवानगीनुसार उर्वरित १० टक्के रिक्त पदे, भरण्यात येतील, असेही आयुक्तांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. आयुक्तांच्या आदेशामुळे भावी गुरुजींमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. पवित्र पोर्टलवर जाहिरात देताना ८० ऐवजी ७० टक्के रिक्त पदांची मागणी करावी, अशी नव्याने सुचना शिक्षण आयुक्तांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना केली आहे.

### शिक्षण विभागात तब्बल ९८५ पदे रिक्त



**गोंदिया जिल्हा परिषदेच्य शिक्षण विभागाता गट ब व ड ची तब्बल ९८५ पदे रिक्त आहे. ब गटात माध्यमिक मुख्याध्यापकांची १३, माध्यमिक शिक्षकांची २६, उच्च माध्यमिक शिक्षकांची ३२, शिक्षण विस्तार अधिकारी श्रेणी २ ची ३, श्रेणी ३ ची २३, केंद्र प्रमुखांची ६५ अशी १५६ पदे रिक्त आहेत. तर गट क मधील उच्च श्रेणी मुख्याध्यापकांची १५३, पदवीधर शिक्षकांची ५८१, माध्यमिक शिक्षकांची ७५, पूर्व माध्यमिक सहायक शिक्षकांची १०, प्रयोगशाळा सहायकांची ८ अशी ८२९ पदे रिक्त आहेत. यातील काही पदे पदोन्नतीद्वारे तर उर्वरित पदे सरळसेवेने भरली जाणार आहेत. वरील आकडेवारी जून २०२३ अखेरची आहे. यानंतर १५० पेक्षा अधिक पदे सेवानिवृत्तीने रिक्त झाली आहेत. तर २०० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांनी सेवासमाप्ती पूर्व निवृत्तीसाठी अर्ज केल्याची माहिती आहे.**

# ग्राम पंचायत कार्यालय अदासी

## पंचायत समिती, गोंदिया

## ई-निविदा सुचना (पहिली वेळ)

जा.क्र.ग्रा.पं.अदासी ई–निविदा २०२४ दिनांकः–०१/०१/२०२४

ग्राम पंचायत अदासी पंचायत समिती, गोंदिया जि.गोंदिया कडून हया द्वारे सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, सदर ग्राम पंचायत मध्ये सन २०२३–२४ ह्या आर्थिक वर्षात विविध काम करणे अंतर्गत विविध योजनाच्या बांधकामे करण्याकरिता संबंधित साहित्य पुरवठा धारक पुरवठा करण्यासाठी द्वि.लिफाफा पद्धतीने खालील साहित्य पुरवठा करण्याकरिता ई–निविदा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहे.

सदर ई–निविदाचे दर दि.०१/०१/२०२४ पासून दि.०८/०१/२०२४ ला ०५.०० वाजे पर्यंत भरता येईल. सदर ई–निविदा दि.०९/०१/२०२४ ला सायंकाळी ०५.०० वाजता उघडण्यात येईल. सदर ई–निविदाची विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in वर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्राम पंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

**ग्रामसेवक** – **ग्राम पंचायत अदासी**

**सरपंच** – **ग्राम पंचायत अदासी**

# ग्रामपंचायत कार्यालय भिवखीडकी

## पंचायत समिती अर्जुनी/मोर. जि.गोंदिया

ग्रा.पं.भिवखीडकी दि.२८/१२/२०२३

## जाहीर निविदा सूचना (पहिली वेळ)

ह्या सुचनेद्वारे सर्व इच्छूक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, मासिक सभा ठराव क्र.७/१ दि.२७/१२/२०२३ अन्वये ग्रामपंचायत भिवखीडकी येथे १५ वा वित्त आयोग निधी (ग्रा.पं.स्तर) अंतर्गत ची कामे करण्याकरिता मोहरबंनद दोन लिफाफा पद्धतीने अनुसूची ब–१ प्रमाणे (टक्केवारी दराने) ऑफलाईन निविदा नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहेत. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दि. ०३/०१/२०२४ दि.१०/०१/२०२४ (सुटीचे दिवस वगळून) पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमूद केल्या प्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारानी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्तीप्रमाणे ह्या नोटीसच्या दिनाकांपासून ग्रा.पं.कार्यालयात दि. १०/०१/२०२४ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निविदा बाबद इतर सविस्तर माहिती व काहीही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

सदर निविदा हि मासिक सभा दि.१७/१/२०२४ ला (शक्य झाल्यास) सर्व संबंधितासमोर उघडण्यात येईल.

निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजित किंमत | नमुना ७ निविदा फार्मची किंमत | निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी क्र.२ देखभाल दुरुस्ती | ७०००० | ५०० | ७०० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| २ | अंगणवाडी क्र.२ रंगरंगोटी व शौचालय दुरुस्ती | ७०००० | ५०० | ७०० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ३ | विहीर व हातपंप ओटे दुरुस्ती | १००००० | ५०० | १००० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ४ | नालीवरती झाकण बसविणे | १००००० | ५०० | १००० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ५ | नवीन हातपंप | १००००० | ५०० | १००० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ६ | नाली दुरुस्ती करणे | १००००० | ५०० | १००० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ७ | नालीवरती झाकण बसविणे | १००००० | ५०० | १००० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ८ | जि.प.शाळा प्रसाधन गृह दुरुस्ती करणे | १००००० | ५०० | १००० | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |
| ९ | ग्रामपंचायत येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे | ८०९७९ | ५०० | ८०९ | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

**ग्रामसेवक** – ग्रामपंचायत, भिवखीडकी, पं.स.अर्जुनी/मोरगाव जि.गोंदिया

**सरपंच** – ग्रामपंचायत, भिवखीडकी, पं.स.अर्जुनी/मोरगाव जि.गोंदिया

# जिल्ह्यात दारू विक्रीचे परवाने किती?

## बियर बारच्या संख्येत झाली वाढ: अवैध दारु विक्रेत्यांवर कारवाई तरी विक्री जोरात

**गोंदिया:** एकेकाळी जिल्ह्यात मोजक्या ठिकाणी जनतेला बार व्यवसाय दहा–पंधरा वर्षात शहरात सर्वत्र विस्तारला गेला. यातून दारु रिचविण्याचे प्रमाणही वाढले. जिल्हा व्यापाराच्या दृष्टीने सतत वाढत आहे. दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाने गेल्या २ वर्षात अवैध दारु विक्री, विनापरवाना हॉटेल, ढाब्यावर ग्राहकांना दारु उपलब्ध करुन देणाऱ्यांवर कारवाई केली. साहित्य जप्तीसह दंडात्मक कारवायांमुळे अनेक ढाबे, हॉटेल चालक, मालक बार परवाना घेण्याकडे वळले. परिणामी, जिल्ह्यात दोन वर्षात बारची संख्या वाढली आहे. जिल्ह्यात पोलीस विभागाकडून अवैध दारु विक्रेत्यांवर कारवाई होत असली तरी अवैध दारु विक्री जोरात सुरु आहे.

### परवाना देताना नियम पाळले जातात

**परवान्याची सर्व प्रक्रिया राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विविध विभागाच्या एनओसीनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती याबाबत निर्णय घेते. पोलीस आयुक्त पोलीस अधीक्षक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्पादन शुल्क अधीक्षक सदस्य सचिव असतात. त्यांच्यासमोर या अर्जासंबंधीची सुनावनी होते.**

### अवैध दारु विक्री सर्रास

**गोंदिया जिल्ह्यात मोहफुलाची दारु मोठ्या प्रमाणात विकली जाते. गोंदिया जिल्ह्यात मोहाचे उत्पादन होत असले तरी मध्य प्रदेशाच्या बालाघाट जिल्ह्यातून दारु तयार करण्यासाठी मोहफुलाची खरेदी केली जाते.**

**जिल्ह्यात दारु विक्रीची दुकाने**

८१ देशी दारु दुकाने

गोंदिया जिल्ह्यामध्ये सरकारमान्य ८१ देशी दारु दुकाने आहेत.

१७६ बार परवाने

गोंदिया जिल्ह्यात १७६ बार सुरु असून, दोन वर्षातील कारवायांमुळे यात वाढ झाली. तर ७ बियर शॉपी आहेत.

२० वाइन शॉप

जिल्ह्यात २० वाइन शॉप आहेत. यात देशी, बियर,वाइन व विदेशी मद्याची विक्री होते. किचकट प्रक्रिया, खर्च अधिक असल्याने वाइन शॉप परवान्यांमध्ये फार वाढ झाली आहे.



**दीड वर्षात बार परवान्यासाठीच्या अर्जात वाढ झाली आहे. विनापरवाना कोणीही मद्य विक्री, पुरवठा करु नये. हा कर बुडविण्याचा प्रकार असून, शासनाची फसवणूक समजली जाते. वारंवार कारवाईत सापडल्यास कठोर कारवाई होईल.**

**मनोहर अंचुळे, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया**

# नगर पंचायत कार्यालय, सडक अर्जुनी

## तालुका-सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया

निविदा सुचना क्र.९३८/न.पं./घ.व्य.कचरा संकलन दिनांक २७/१२/२०२३

## ई-निविदा सुचना

सडक अर्जुनी नगर पंचायत विभागातर्फे **१५ वित्त आयोग योजने अंतर्गत** नगरातील घनकचरा व्यवस्थापन कचरा संकलन, वाहतुक व प्रक्रिया कामाचे ई–निविदा ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. सदरहू कामे महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) प्रसिद्ध करण्यात येत असून दि.२८/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**ई–निविदा प्रसिद्धीची तपशील**

| | |
|---|---|
| ई–निविदा प्रसिद्धी | दि.२८/१२/२०२३ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ई–निविदा व दस्ताऐवज डाऊनलोड | दि.२८/१२/२०२३ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ई–निविदा दाखल करण्याचा दिनांक | दि.२८/१२/२०२३ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ई–निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि.१८/०१/२०२४ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ई–निविदा उघडण्याचा दिनांक | दि.१९/०१/२०२४ सायं.४.०० वाजता (शक्य झाल्यास) |

**टिप:–वरील कामाची निविदि प्रक्रिया ई–निविदा द्वारे ऑनलाईन करण्यात येईल. सदर निविदा सुचना, इतर अटी व शर्ती शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून वर दिलेल्या रकान्यातील तपशिलाप्रमाणे डाऊनलोड करुन भरता येईल. संबंधित कामाची अनामत रक्कम व प्रपत्र Online netbanking च्या माध्यमातून भरावी लागेल.**

–स्वा./– **श्री.तेजराम मडावी**, अध्यक्ष, नगर पंचायत सडक अर्जुनी

–स्वा./– **सौ.वंदना डोंगरवार**, उपाध्यक्ष तथा सभापती स्वच्छता व आरोग्य समिती, नगर पंचायत सडक अर्जुनी

–स्वा./– **शरद हलमारे**, मुख्याधिकारी, नगर पंचायत सडक अर्जुनी

# वाहनचालकांचे चक्का जाम आंदोलन

## नवीन वाहतूक कायद्याला विरोध : जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

### टायरची केली जाळपोळ

**वाहनचालकांनी केंद्र सरकारच्या नवीन वाहतूक कायद्याचा सोमवारी रस्त्यावर उतरून विरोध केला. शहरातील रामनगर, बालाघाट टी पॉइंट, जयस्तंभ चौक येथे टायरची जाळपोळ केली आहे. यामुळे पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केल्याची माहिती आहे.**



**गोंदिया:–** रस्ते अपघातानंतर लोकांच्या रोषाला घाबरून पळून जाणाऱ्या जड वाहनचालकांविरुद्ध संसदेत पारित झालेल्या कठोर विधेयकाच्या निषेधार्थ सोमवारी (दि. १) दुपारी १ वाजता गोंदिया–बालाघाट मार्गावरील आंबेडकर चौक येथे वाहनचालक परिचालक संघाच्या नेतृत्वात मोटारचालकांसह वाहतूकदारांनी मचक्का जामफ आंदोलन केले. या आंदोलनात जिल्ह्यातील शेकडो वाहनचालक व वाहतूकदार सहभागी झाले होते. नववर्षाच्या पहिल्याच दिवसाची सुरुवात वाहनचालकांच्या आंदोलनाने झाली. या आंदोलनामुळे आंबेडकर चौकात काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता संसदेत मोदी सरकारने नवीन विधेयक मंजूर करून घेतले आहे. रस्त्यावर अपघात घडल्यानंतर जड वाहनांचे चालक जखमींची मदत करण्यासाठी न थांबता पळून जातात. अशा चालकाविरुद्ध नवीन कायद्यानुसार दाखल होणाऱ्या खटल्यात दहा वर्षे सक्तमजुरी आणि पाच लाख रुपये दंडाची कठोर शिक्षा होण्याची तरतूद आहे. वास्तविक पाहता अशा अनेक अपघातांमध्ये वाहनचालक झुंडीच्या हल्लयामुळे घाबरून पळून जातात.

पळून जाणे हा त्यांचा दोष असू शकत नाही, तर ती अपरिहार्यता असते. तसेच जिल्ह्यातील रस्त्यांची अवस्था फारच बिकट असल्याने वाहन अपघातात वाढ झाली आहे. तर नवीन कायद्यानुसार अपघात झाल्यास वाहनचालकाला १० वर्षांची शिक्षा व ७ लाख रुपयांचा दंड होणार आहे. चार पाच हजार रुपये महिन्याने काम करणारा वाहनचालक दंडाची रक्कम भरणार कुठून, असा सवाल वाहनचालक परिचालक संघटनेने केला आहे.

वाहनचालकाला १० वर्षांची शिक्षा झाली तर त्याच्या कुटुंबाची जबाबदारी कोण घेणार, अपघात झाल्यानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार न होता अपघातातील जखमींना रुग्णालयात दाखल करावे, असे म्हटले; पण घटनास्थळवर जमावाने चालकाला मारहाण केल्यानंतर त्याचा जीव गेल्यास त्याची हमी कोण घेणार, असा सवालदेखील उपस्थित केला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने हा नवीन कायदा त्वरित रद्द करावा, अशी मागणी वाहनचालक परिचालक संघ, ट्रक ड्रायव्हर वेलफेअर असोसिएशन, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

### पेट्रोलपंपावर वाहनांच्या रांगा

**वाहनचालकांनी सोमवारपासून आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात ट्रक, काळी–पिवळी चालक, ऑटो चालक, टँकरचालक व खासगी वाहन चालकसुद्धा सहभागी झाले आहेत. हे आंदोलन किती दिवस चालेल याची माहिती नाही. त्यामुळे पेट्रोल मिळणार की नाही या भीतीने वाहनचालकांनी शहरातील सर्वच पेट्रोलपंपांवर पेट्रोल भरण्यासाठी गर्दी केली होती. त्यामुळे पेट्रोलपंपावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.**

### प्रवाशांची गैरसोय

**वाहनचालकांनी पुकारलेल्या आंदोलनात सोमवारी काळी–पिवळी चालक, ऑटोचालक, ट्रॅव्हल्स चालक सहभागी झाल्याने बाहेरगावी जाणाऱ्या आणि रेल्वेस्थानकावरून शहरात जाण्यासाठी मनस्ताप सहन करावा लागला, तर ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या नागरिकांनासुद्धा याचा फटका बसला.**

# आंभोरा पुलाचे लोकार्पण केव्हा होणार?



**नागपूर:** पाच नद्यांच्या संगमावर असलेल्या आंभोरा या तीर्थक्षेत्राला अन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे या परिसराचे सौंदर्यीकरण आणि विकासाची काम हाती घेण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून नागपूर आणि भंडारा या दोन जिल्ह्यांना जोडणारा महत्वाकांक्षी पूल तयार करण्यात आला. मात्र गेल्या वर्षभरापासून हा पूल तयार होऊनही लोकार्पणाअभावी त्यावरुन वाहतूक सुरु होऊ शकली नाही. परिणामी आंभोरा येथे भंडारा जिल्ह्यातून येण्यासाठी आणि या पसिरातील नागरिकांना भंडारा जिल्ह्यात जाण्यासाठी जवळपास ९० किमी अंतराचा वेढा घेून जावे लागते, हे विशेष.

वैनगंगा, कन्हान,आम, मुरझा आणि कोलारी या पाच नद्यांच्या संगमावर आंभोरा तीर्थक्षेत्र वसलेले आहे. मंदिर, शिवलिंगासह पौराणि महत्व या तीर्थक्षेत्राला प्राप्त झालेले आहे. आतापर्यंत आंभोरा हे दुर्लक्षित तीर्थक्षेत्र म्हणून नावारुपास आलेले होते. परंतु त्यानंतर लोकप्रतिनिधींचा पुढाकार, देवस्थान प्रतिष्ठानचा मागोवा यामुळे येथील विकासाची दालने खुली झाली. पुर्वी या ठिकाणी भंडारा जिल्ह्यातून येणाऱ्या भाविकांना वैनगंगा पार करण्यासाठी नावेचा वापर करावा लागत. मात्र पुरपरिस्थिती निर्माण झाल्यास अडचण व्हायची. त्यातच गोसेखुर्द धरणात पाणी भरल्यानंतर अथांग पाण्याने या तीर्थक्षेत्रांकडे भाविकांनी पाठ फिरविली. अशात दोन जिल्ह्यांना जोडण्यासाठी पुलाचे काम हाती घेण्यात आले. त्यानुसार १६७ कोटी रुपये खर्च करुन ७०५.२० मीटर लांब, १५.२६ मीटर रुंदीचा पूल डिसेंबर २०२२ मध्ये पूर्णत्वास आला. विशेष म्हणजे विदर्भातील हा पहिला केबल पूल आहे. या पुलाच्या परिसरात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी दोन बाजूला फुटपाथ, पॅनोरॅमिक लिफ्ट आणि जिने आहेत. या पुलावरुन चैतन्येश्वर मंदिर परिसरासह आसपासच्या क्षेत्रातील उत्कृष्ट दृष्ये पर्यटकांना पाहता येणार आहेत.

### कुणामुळे अडले लोकार्पण

**गेल्या वर्षभरापासून हा पूल तयार झाला आहे. त्यावर आकर्षक रोषणाई करण्यात आली असून रात्रीच्या वेळी प्रकाशाने हा पूल पर्यटक,भाविकांचे लक्ष वेधून घेतो. अद्ययवत तंत्रज्ञानाने हा पूल तयार करण्यात येऊन पूर्ण झाला असूनही लोकार्पणाअभावी मात्र वाहतुक सुरु होऊ शकली नाही. कुण्या नेत्याची तारीख मिळाली नाही. त्यामुळे पूलाचे लोकार्पण रखडले आहे. असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. यापुर्वी मे २०२३ मध्ये या पूलाचे लोकार्पण होणार होते. परंतु तो मुहूर्त हुकला. आता पुढचा मुहूर्त कधी मिळणार, असा प्रश्न पडला आहे. दुसरीकडे ९० किमीचा फेरा आणि दगदग कमी करावी, अशी मागणी भाविकांनी केली आहे.**

# समृद्धीच्या मार्गाने येणार जिल्ह्यात विकासाची समृद्धी

## समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत होणार विस्तार: शेती, व्यापाराला चालना

**गोंदिया:** महाराष्ट्राची राजधानी मुंबई व उपराजधानी नागपूर ही शहरे जोडणारा राज्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ६०० किमी. लांबीचा पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला झाला आहे. उर्वरित मार्गही लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या पूर्व व पश्चिम सीमा शीघ्र संचार द्रुतगती महामार्गाने जोडण्याच्या दृष्टीने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा विस्तार नागपूरपासून गोंदिया–भंडारा ते गडचिरोली पर्यंत करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे गोंदिया तालुक्यात प्रति तास १२० किमी वेगाने प्रवास करण्याचे पंख मिळणार असून समृद्धीच्या मार्गाने जिल्ह्यात समृद्धी येणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील पूर्व विभागातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर हे जिल्हे नैसर्गिक खनिज साधनसंपत्तीने समृद्ध आहेत. अल्प विकसीत असलेल्या या भागांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने नागपूर ते गोंदिया (पॅकेज १), भंडारा ते गडचिरोली (पॅकेज २) व नागपूर ते चंद्रपूर (पॅकेज ३) अंतर्गत प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार द्रुतगती महामार्गाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यात आले आहे. राज्याच्या पूर्व भागातील अविकसीत तसेच आदिवासी क्षेत्र मुख्य प्रवाहाशी जोडले जाऊन त्या परिसराचा सामाजिक व आर्थिक विकास होण्यास मदत होईल. नवीन उद्योगाला चालना मिळून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.

### व्यापारी फेडरेशनने केले निर्णयाचे स्वागत

**समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत विस्तार करण्यासंदर्भातील शासन निर्णय निघाल्यानंतर या निर्णयाचे गोंदिया जिल्हा व्यापारी असोसिएशनने स्वागत केले आहे. गोंदिया ते नागपूर या १६२ किमीच्या मार्गाला मंजुरी दिल्याने जिल्ह्यातील शेतीसह व्यापाराला चालना देण्यास मदत होणार आहे. समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत विस्तार करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, खा. प्रफुल्ल पटेल, सुनील मेंढे व लोकप्रतिनिधींचे आभार मानले आहे.**



### पायाभूत सुविधांचा विकास करण्यास होईल मदत

**आंतरराज्य प्रवासी आणि मालवाहतुकीमुळे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाची व्यवहार्यता सुधारण्यासाठी मदत होईल. पूर्व महाराष्ट्रातील अल्प विकसित जिल्ह्यांचा सामाजिक, आर्थिक विकास होईल. पायाभूत सुविधांचा लाभ आदिवासी भागाचा विकास करण्यासाठी होईल. त्यामुळे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग नागपूरचे पुढे गोंदिया, भंडारा ते गडचिरोली दरम्यान प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार द्रुतगती महामार्ग विकसित करणे प्रस्तावित आहे.**

### समृद्धी महामार्ग विस्ताराचा उद्देश

**नागपूर–गोंदिया प्रवेश नियंत्रित शीघ्र संचार द्रुतगती महामार्ग विकसित करणे ही पूर्व महाराष्ट्रातील प्रमुख विकास योजनांपैकी एक आहे. नागपूर शहराला मार्गे गोंदिया, भंडारा आणि पुढे मुंबईशी प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्गाने जोडणे, राज्याच्या पूर्व आणि पश्चिम सीमांना द्रुतगती महामार्गाने जोडणे, देशाच्या उत्तर आणि ईशान्येकडील मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा आणि पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांशी द्रुतगती महामार्गाद्वारे आंतरराज्यीय संपर्क स्थापित करणे.**

### अंतिम आराखड्याचा शासन निर्णय

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मार्गदर्शक तत्वांना (इंडियन रोड काँग्रेस विशेष पब्लिकेशन क्र.१९:२०२० च्या मूल्यांकन मॅट्रिक्स) अनुसरुन व प्रत्यक्ष स्थळ पाहणीनुसार विविध पर्यायी आखणीचा अभ्यास केला आहे. तुलनात्मकदृष्ट्या सर्वाधिक सुयोग्य अशी आखणी खालील भागानुसार अंतिम आखणी म्हणून महामंडळाने प्रस्तावित केली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या उपरोक्त आखणीला अंतिम आखणी म्हणून शासन मान्यता देण्यात आली आहे.**

# अंगणवाडी सेविकांचे जेलभरो आंदोलन



**गोंदिया:** जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी वेतनश्रेणी व पेंशन लागू करण्याच्या मुख्य मागणीसाठी १ जानेवारी रोजी फुलचूर नाका येथे जेल भरो आंदोलन केले. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविकांना कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, अंगणवाडी सेविकांना २६ हजार व मिनी अंगणवाडी सेविकांना २० हजार मासिक वेतन द्यावे, ग्रज्युएटी व पीएफ लागू करुन पेंशन लागू करावी, पोषण आहाराचे १६ हजार रुपये द्यावे या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियन व कृती समितीच्या नेतृत्वात जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस ४ डिसेंबरपासून आपल्या मागण्यांसाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन करीत आहेत.

मात्र त्यांच्या आंदोलनाची शासन व प्रशासनाने दखल घेतली नाही. यादरम्यान त्यांनी आमदार विनोद अग्रवाल यांच्या कार्यालयासमोरही आंदोलन केले. त्यांनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांची मागणी शासन दरबारी मांडण्याचे आश्वासन दिले होते. मात्र मागण्या पूर्ण होण्यासंदर्भात शासन व प्रशासन स्तरावर कोणत्याही हालचाली दिसून न आल्याने १ जानेवारी रोजी अंगणवाडी सेविका व मदतनीसांनी फुलचूर नाका येथे मोर्चा काढून जेल भरो आंदोलन केले.

तत्पूर्वी आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणा देत शासनाच्या वेळ काढू धोरणाचा निषेध करण्यात आला. तसेच मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

आंदोलनात संघटनेचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, सचिव मिलिंद गणवीर, जिल्हा सचिव रामचंद्र पाटील, करुणा गणवीर, शकुंतला फटींग, आम्रपाली डोंगरे, विठा पवार, राजलक्ष्मी हरिणखेडे, लालेश्वरी शरणागत, जीवनकला वैद्य, अंजना ठाकरे, पौर्णिमा चुटे, प्रनिता रंगारी, ज्योती लिल्हारे, सुनिता मलगाम, अनिता शिवणकर यांच्यासह शेकडो अंगणवाडी सेविका व मदतनीस सहभागी झाले.

# जिल्ह्यातील ९९९ दुकानदार सहभागी: १६ जानेवारीपर्यंत बंद



**गोंदिया:** धान्यावरील कमिशनमध्ये वाढ, स्वस्त धान्य दुकानदारांना आरोग्य सुविधा यांसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी नववर्षाच्या सुरुवातीपासून (दि.१) रेशन दुकानदारांनी बेमुदत संप पुकारला आहे. यामध्ये जिल्ह्यातील ९९९ दुकानदार सहभागी झाले आहेत. १६ जानेवारीपर्यंत हा संप असणार आहे. या कालावधीत धान्य स्वीकारणे, धान्य वितरित करणे आणि शासनाला माहिती पुरविणे ही सर्व कामे बंद असणार आहे.

दुकानदारांना दिल्या जाणाऱ्या तुटपुंज्या कमिशनवर कुटुंबाचा खर्च भागत नाही. महागाईचा उच्चांक असताना अनेक वर्षे मागणी करुनही शासनाने कमिशन वाढविले नाही. कोरोना काळात स्वत:चा जीव धोक्यात घालून दुकानदारांनी नागरिकांपर्यंत धान्य पोहोचविले. काही जणांचा त्यात मृत्यू झाला तरी शासनाला त्याची दखल घ्यावीशी वाटली नाही. पॉस मशीनमध्ये वारंवार बिघाड होऊन दुकानदारांना मनस्तापाला सामोरे जावे लागते. केरोसिन व्यवसाय बंद केल्याने ५५ हजारांवर व्यावसायीक रस्त्यावर आले. यापैकी कोणत्याही विषयात शासनाने स्वस्त धान्य दुकानदारांची दखल घेतली नाही. देशपतळीवरील निर्णयानुसार सोमवारपासून दुकाने बेमुदत बंद ठेवण्यात आले. सोमवारी जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालयासमोर दुकानदारांनी धरणे आंदोलन केले.येत्या १६ जानेवारीपर्यंत संप कायम राहणार आहे. त्यानंतरही शासनाने मागण्यांची पूर्तता न केल्यास १६ जानेवारीला दिल्ली येथे रामलीला मैदान ते संसद भवनापर्यंत जाऊन पंतप्रधानांना निवेदन देण्यात येणार आहे. त्यानंतर देशस्तरीय फेडरेशनच्या बैठकीत जो निर्णय होणार त्याप्रमाणे आंदोलनाची दिशा ठरणार आहे.

### १ लाख ७१ हजार कार्डधारकांना फटका

**जिल्ह्यात अंत्योदय योजनेचे ३२ हजार ९४६, प्राधान्य कुटुंबातील ५२ हजार १४६ आणि एनपीएच अंतर्गत ८६ हजार ५७८ कार्डधारक आहेत. रेशन दुकानदारींनी बंद पुकारल्यामुळे कार्डधारकांना रेशनचे धान्य मिळणार नाही. त्यामुळे या कुटुंबाची वाताहत होणार आहे.**

### शासन उठले जीवावर

**आम्ही वारंवार शासनाला निवेदन दिले. कठीण काळात देखील स्वस्त धान्य दुकानदारांनी काम केले. त्याचा अत्यल्प मोबदला देण्यात येत आहे. वारंवारच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याने देशव्यापी संप करावा लागल. कार्डधारकांना त्रास देण्याचा हेतू नाही. मात्र शासनाच्या अडेलतट्टूपणामुळे नाईलाजाने संप करावा लागत आहे.**

**योगराज रहांगडाले, जिल्हाध्यक्ष, स्वस्त धान्य दुकानदार संघटना**

### शहिदांच्या बलिदानापासून प्रेरणा घ्या : आ.विनोद अग्रवाल

**गोंदिया :** २३ नोव्हेंबर १९९४ रोजी आपले हक्क व अधिकाराच्या न्याय मागणीसाठी लढा देताना ११४ गोवारी बांधव शहिद झाले. त्यांच्या स्मृतित आदिवासी गोवारी शहिद स्मारक तयार करण्यात आले. हे स्मारक समाजाच्या लढ्याला प्रेरणा देण्याचे काम करणार आहे. यामुळे गोवारी समाजाच्या सर्व संघटनांनी वज्रमुठ करून न्यायासाठी लढा देण्याचा संकल्प घ्यावा, हीच शहिदांना खरी श्रध्दांजली ठरेल. यासाठी स्मारकापासून प्रेरणा घेऊन गोवारी समाज बांधवानी समाजाच्या लढ्यात सहभागी व्हावे, असे प्रतिपादन आ.विनोद अग्रवाल यांनी केले.

स्थानिक गोवर्धन चौक छोटा गोंदिया येथे ३० डिसेंबर रोजी आदिवासी गोवारी समाज संघटनेच्या वतीने शहिद गोवारी स्मारक लोकार्पण, श्रध्दांजली कार्यक्रम व प्रबोधन मेळावा आयोजित करण्यात आला होता.

### श्री रामाचा रथ घेऊन कारसेवक खासदार निघाले यात्रेला

**भंडारा:** ३५ वर्षांपूवी कारसेवक म्हणून प्रभू श्रीरामांची सेवा करण्याची संधी मिळाली. तेव्हापासून मनात अयोध्येतील श्री राम मंदिराचा ध्यास लागून होता. तो क्षण जवळ आला असताना पुन्हा एकदा, कारसेवक असलेल्या खासदार सुनील मेंढे यांनी रामासाठी अनोख्या पद्धतीने सेवा देण्याचा निर्णय घेत, संपूर्ण लोकसभा मतदारसंघात श्री राम रथयात्रा काढण्याचा निर्धार जाहीर करीत आज २ जानेवारीपासून या श्री राम रथयात्रेला सुरुवात झाली. पवनी तालुक्यातील घड्याळ येथून निघालेला श्रीरामांचा रथ आता २१ तारखेलाच थांबणार आहे.

# गोंदिया, भंडारा जिल्ह्यात नवे तालुके निर्माण करून साकोली जिल्हा करा–सेवक वाघाये



**गोंदिया:** फक्त नवे तालुके होणार, नव्या जिल्ह्यांचा विस्तार नाही, असे प्रतिपादन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सभागृहात केले आहे. या पार्श्वभुमीवर भंडारा–गोंदिया जिल्ह्यातील बेरोजगार आणि शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी या दोन्ही जिल्ह्यांत नवे तालुके निर्माण करा, अशी मागणी माजी आमदार सेवक वाघाये यांनी केली आहे.

राज्यात नवीन २२ जिल्हे व ३९ तालुक्यांच्या निर्मितीवर महसूल विभागाकडे यापुर्वीच प्रस्ताव आहे. राज्य शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली यापुर्वी एक समितीसुद्धा गठित केली होती. त्यात साकोलीच्या नावाचा समावेश असून ही मागणी मागील अनेक दिवसांपासून जनतेकडून केली जात आहे. इंग्रज सरकारने भंडारा जिल्ह्यात तीन उपविभाग बनविले होते. त्यात भंडारा जिल्ह्यासह भंडारा, गोंदिया व साकोली हे तीन उपविभाग होते. नंतरच्या काळात गोंदिया जिल्हा वेगळा झाला. साकोली शहर राष्ट्रीय महामार्गावर असून, शा शहराचा थेट राज्य महमार्गावर संपर्क आहे. साकोली हे सध्य उपविभाग असून या शहराला नवेगावबांध, नागझिरा, इटियाडोह प्रकल्पाचा पसिसर लागून आहे. पर्यटनातून भविष्यात या नव्या जिल्ह्याला चांगला वाव आहे. गोंदिया, गडचिरोली, भंडारा या तिन्ही ठिकाणी हे शहर जोडलेले आहे.

गोंदिया जिल्ह्याशी जोडलेल्या काही तालुक्यांना गोंदिया जिल्हा मुख्यालय हे अनेक कारणाने गैरसोयीचे आणि लांब अंतराचे आहे. त्यामुळे सध्या उपविभाग असलेल्या साकोली हे जिल्ह्याचे ठिकाण बनवले तर जनतेला विविध कामांसाठी सोयीचे होणार आहे. भंडारा आणि गोंदिया या दोन्ही जिल्ह्यात मिळून सानगडी, पालांदूर, अडळाच हे भंडारा जिल्ह्यात नवे तालुके निर्माण होऊ शकतात. तसेच चिचगड, दवनीवाडा, रावणवाडी, नवेगावबांध हे गोंदिया जिल्ह्यातील नवे तालुके बनवले जाऊ शकतात. यासोबतच भंडारा जिल्ह्यातील अडयाळ, दिघोरी तसेच पालांदूर हे नवे तालुके भंडारा जिल्ह्यात निर्माण केले जाऊ शकतात.

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी, लाखनी, मोरगाव अर्जुनी, लाखांदूर, साकोली तसेच नव्याने निर्माण होऊ पाहणारे अडयाळ, पालांदूर, दिघोरी या तालुक्यांचा मिळून साकोली जिल्हा सहज अस्तित्वात आणला जाऊ शकतो. साकोली जिल्हा निर्मिती हे आपले स्वप्न आहे. य नव्या जिल्ह्याची निर्मिती जे करतील त्यांच्या पाठीशी आपण उभे राहू असे वाघाये यांनी म्हटले आहे.

### अडयाळची संधी कमजोर नेतृत्वामुळे हुकली

**अड्याळ या तालुका निर्मितीची जवळपास सगळी तयारी झाली होती. मात्र तत्कालीन स्थानिक कमजोर नेतृत्वामुळे तालुका होण्यापासून संधी हुकली. अशी टीका सेवक वाघाये यांनी केली आहे. राजकीय प्रयत्न कमी पडल्यामुळे हे क्षेत्र तालुका होण्यापासून वंचित राहिले, असे वाघाये यांचे मत आहे.**

# पडक्या वर्गखोल्यांना हवा २७ कोटींचा बूस्टर

## २०० वर्गखोल्यांची स्थिती गंभीर: विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका

**गोंदिया:** शासनाने अतिमहत्वाच्या असलेल्या शिक्षण विभागाकडेच दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी गळती सुरु आहे. तर दुसरीकडे शाळांच्या इमारती मरणासन अवस्थेत असल्यामुळे पालक देखील आपल्या पाल्यांना पडक्या शाळांत पाढविण्यास मागेपुढे बघत आहेत. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या एकूण १ हजार ६४५ शाळांपैकी तब्बल दोनशे वर्गखोल्या पडक्या अवस्थेत आहे. १८३ वर्गखोल्यांचे बांधकाम करणे गरजेचे आहे. मात्र, निधीच नसल्यामुळे तशाच शाळांतून ज्ञानदान करावे लागत आहे. वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा परिषदेला २७ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे.

एकेकाळी जिल्हा परिषदेच्या शाळा गजबजलेल्या असायच्या, त्यावेळी शिक्षकांना कमी वेत असले आणि इतर भौतिक सुविधा मिळत नसल्या तरी शाळा विद्यार्थ्यांनी गजबजलेल्या होत्या. मात्र, गेल्या काही वर्षांपासून जीर्ण झालेल्या इमारती, शिक्षकांची अपुरी संख्या, आधीच कमी असलेल्या शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण आणि शासनाकडून शिक्षण क्षेत्रासाठी लागणाऱ्या निधीसाठी आखुडता हात घेण्यात येत आहे. त्याचा फायदा खासगी शाळांनी घेतल.

खासगी शाळांमध्ये पालक पैसे भरुन पाल्यांना पाठवत आहे. तर दुसरीकडे मोफत शिक्षण असताना देखील जिल्हा परिषदेच्या शाळा ओस पडत चालल्या आहेत. आजघडीला जिल्हा परिषदेच्या १ हजार ६४५ शाळा आहेत. त्या शाळांमध्ये लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र त्या शाळांपैकी २०० वर्गखोल्या जर्ण असून कधीही छत कोसळण्याची भीती सतावत आहे. तर अनेक शाळांतील वर्गखोल्यांना गळती लागली असून ताडपत्रीचा आधार घेत विद्यार्थ्यांना तिथेच बसवून शिक्षण द्यावे लागत आहे.

आजघडीला किमान १८३ वर्गखोल्यांचे बांधकाम करणे नितांत गरजेचे आहे. त्यासाठी प्रस्ताव तयार करुन जिल्हा परिषदेचे जिल्हा नियोजन समितीकडे पाठविला. शाळा बांधकामासाठी २७ कोटी रुपयांची गरज आहे. मात्र, नियोजन समितीकडून तोकडा निधी मंजूर केला जात आहे. जोपर्यंत निधी येतो. तोपर्यंत पुन्हा दुसऱ्या शाळेतील खोली जीर्ण झालेली असते अशी अवस्था आहे.

शाळांच्या या स्थितीमुळे विद्यार्थ्यांचा जीव देखील टांगणीला सतो. पालक आपल्या पाल्यांच्या सुरक्षिततेसाठी तो घरी परत येईपर्यंत चिंतेत असतात. जिल्हा परिषदेने २८ कोटी रुपयांची मागणी नियोजन समितीकडे केली. परंतु अद्यापही त्यावर विचार झालेला नाही. त्यामुळे शासन आणि लोकप्रतिनिधी तसेच अधिकारी महत्वाच्या बाबीकडेच दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

### स्ट्रक्चरल ऑडिटच नाही

**जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती जीर्ण आहेत. त्यांची दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम करणे गरजेचे आहे. नादुरुस्ती किंवा नवीन बांधकामाचा अहवाल तयार करण्यात येतो. मात्र जिल्हा परिषदेत शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची पद्धत नाही. त्यामुळे नेमका आणि किती भयावह स्थिती आहे. हे समोर येत नाही. स्ट्रक्चरल ऑडिट केल्यास दूध का दूध आणि पाणी का पाणी होणार आहे.**



### निधीची मागणी

**जिल्हा परिषदेचे जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी केली आहे. पालकमंत्री यांच्याशी यसंदर्भात बोलणी झाली आहे. निधी मिळताच नवीन बांधकाम आणि दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.**

**यशवंत गणवीर, सभापती शिक्षण व आरोग्य**